दैनिक

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

www.globalbharatlive.com

# ग्लोबल भारत

◆ औरंगाबाद ◆ वर्ष ५ वे ◆ अंक १८४ वा ◆ पाने ८ ◆ मुल्य ५ रु

dailyglobalbharat@gmail.com | रविवार दि.३० मार्च २०२५ | संपादक - शरद खेमचंद अडागळे

## करुणा शर्माशी अधिकृत लग्न केले नाही

### धनंजय मुंडे यांचा कोर्टात युक्तिवाद

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- वांद्रे सत्र न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना करुणा शर्मा यांना दरमहा २ लाख रुपयांची पोटगी देण्याचे आदेश दिलेत. मुंडे यांनी या आदेशांना माझगाव सत्र न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी शनिवारी झालेल्या सुनावणीत धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या वकिलांत जोरदार युक्तिवाद झाला. त्यात मुंडे यांच्या वकिलांनी आपल्या अशिलाचे करुणा शर्मा यांच्याशी अधिकृत लग्न झाले नसल्याचा दावा केला. त्यावर कोर्टाने त्यांना धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्यासी अधिकृत लग्न केले नाही, तर मुंडे व शर्मा यांच्या दोन मुलांचे आई - वडील कोण? असा उलटप्रश्न केला. त्यामुळे हे प्रकरण आता एका वेगळ्या वळणावर पोहोचले आहे.

माझगाव कोर्टाने या प्रकरणी करुणा शर्मा यांच्या वकिलांना धनंजय मुंडे यांच्यासोबत झालेल्या लग्नाचे पुरावे सादर करण्याचे आदेश दिलेत. त्यानुसार त्यांनी हे पुरावे सादर करण्यासाठी आपल्याला वाढीव वेळ हवी असल्याचे कोर्टाला सांगितले. त्यानुसार, कोर्टाने त्यांना हे पुरावे पुढील तारखेपर्यंत सादर करण्याचे आदेश देत प्रकरणाची सुनावणी ५ एप्रिलपर्यंत स्थगित केली.

आजच्या सुनावणीत धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या वकिलांनी एकमेकांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. पण दोन्ही पक्षांनी वेळोवेळी उलटप्रश्न विचारून स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः कोर्टानेही दोन्ही पक्षकारांना वेगवेगळे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या युक्तिवादात मुंडे यांच्या वकिलांनी धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्याशी अधिकृतपणे लग्न केले नसल्याचा दावा केला. त्यावर न्यायाधीशांनी त्यांना मग धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या २ मुलांचे आई- वडील कोण? असा प्रश्न केला.

त्यावर मुंडे यांच्या वकिलांनी आपल्या अशिलाने त्यांचा स्वीकार केल्याचे नमूद केले. तसेच त्यांच्या आईशी लग्न केले नसल्याचे पुन्हा एकवार सांगितले. त्यानंतर पुन्हा कोर्टाने मुले तुमची आहेत म्हणता, मग करुणा शर्मा त्यांच्या आई नाहीत असे कसे म्हणता? असा सवाल केला. त्यावर मुंडेंचे वकील म्हणाले, धनंजय मुंडे यांनी दोन्ही मुलांना स्वीकारले आहे. त्यांना आपले नाव दिले आहे. त्यांनी करुणा शर्मा यांच्यासोबत काही काळ घालवला याचा अर्थ त्या धनंजय मुंडे यांच्या पत्नी होत नाहीत. त्यांचे संबंध पती-पत्नीसारखे नव्हते. त्यांचे अधिकृत लग्नही झाले नव्हते.

धनंजय मुंडे यांचे एक लग्न झाले आहे. त्यामुळे त्यांनी दुसरे लग्न केले नाही. धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्यात परस्पर संमतीने संबंध प्रस्थापित झाले होते. हे त्यांनी कुठेही लपवून ठेवले नाही. केवळ या दोघांचे लग्न झाले नाही. मुंडे यांच्या वकिलांनी यावेळी करुणा शर्मा या आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याची बाबही कोर्टाच्या निर्दशनास आणून दिली. करुणा शर्मा यांचे वार्षिक उत्पन्न १५ लाखांच्या आसपास आहे. त्या प्राप्तिकरही भरतात. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. त्यांनी निवडणूकही लढवली. त्यानंतरही त्यांनी पोटगीसाठी (पान ४ वर)

## हर्षवर्धन सपकाळांचा कर्जमाफीवरून अजित पवारांवर हल्लाबोल

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शेतकऱ्यांच्या कर्जमाफीस आर्थिक स्थितीचे कारण देत नकार दिल्यानंतर हे बोलताना ना यांची जीभ थरथरते ना यांना लाज वाटते. जनतेने राक्षसी बहुमत देऊन यांना सत्तेवर बसवलेले लोक आता राक्षसाप्रमाणे बोलू लागलेत, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांन पुढे म्हटलंय की, नरेंद्र मोदी एक राजकीय व्यक्तिमत्व म्हणून २००२ या वर्षी गुजरातमध्ये झालेल्या जातीय दंगलीनंतर उदयाला आले. या दंगलीत मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याकांवर अत्याचार झाले. त्या पार्श्वभूमीवर मोदी यांची जगाला, देशाला ओळख झाली. भाजपकडून अल्पसंख्याकांना तिकीट देताना, मंत्रीपद देताना दुजाभाव केला जातो. त्यांची मुस्लीमविरोधी वक्तव्ये पाहिल्यानंतर 'सौगात-ए-मोदी' म्हणजे 'सौ चुहे खा के बिल्ली हज को चली'असा टोला त्यांनी लगावला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, हे बोलताना ना यांची जीभ थरथरते ना यांना लाज शरम वाटते. जनतेने राक्षसी बहुमत देऊन सत्तेवर बसवलेले लोक आता राक्षसाप्रमाणे बोलू वागू लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत कर्जमाफी देऊ असे आश्वासन देऊन महायुतीने राज्यातील शेतकऱ्यांची मते घेतली आणि सत्तेवर येताच ३१ मार्च पूर्वी पीक कर्ज भरा, कर्जमाफी मिळणार नाही असे मुजोरपणे सांगत आहेत. लाडक्या बहिणींची फसवणूक अगोदरच केली आहे. २१०० चे आश्वासन देऊन त्यांच्या हातावर १५०० रुपये टेकवले जात आहेत. विविध कारणे देऊन १० लाखांहून अधिक महिलांना अपात्र करून योजनेचा लाभ बंद केला आहे आणि २१०० रुपये मिळण्यासाठी ५ वर्ष वाट पहावी लागेल असे उद्दामपणे सांगत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना यापूर्वी वीजमाफी, पीक कर्जाच्या व्याजात सवलत, दुधाचे अनुदान देण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेवर तर सुमारे ४५ हजार कोटींचा बोजा सरकारवर असल्याने कर्जमाफीसारखी सध्या तरी राज्याची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांसह कर्जदारांनी ३१ मार्चपूर्वी बँकांमध्ये कर्जाचे परतफेड करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिल्यानंतर हर्षवर्धन सपकाळांनी ट्विट केले आहे.

## कुणाल कामराविरुद्ध ३ नवीन गुन्हे दाखल

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मुंबईतील खार पोलिस स्टेशनमध्ये स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा याच्याविरुद्ध तीन नवीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही प्रकरणे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत दिलेल्या वादग्रस्त विधानाशी संबंधित आहेत.

शनिवारी मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिली तक्रार जळगावच्या महापौरांनी दाखल केली आहे, तर उर्वरित प्रकरणे नाशिकमधील एका हॉटेल व्यापारी आणि एका व्यावसायिकाने दाखल केली आहेत. मुंबई पोलिसांनी कामरा याला दोन समन्स बजावले आहेत. त्याला ३१ मार्च रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या अध्यक्षांनी २७ मार्च रोजी त्याच्याविरुद्धची विशेषाधिकार भंगाची नोटीस स्वीकारली आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात आले आहे. तथापि, शुक्रवारी त्याला मद्रास उच्च न्यायालयाकडून ७ एप्रिलपर्यंत अटकपूर्व जामीन मिळाला (पान ४ वर)

## राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.

जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.



महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विभागाचा विकास गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष, (पान ४ वर)

## उज्ञैनप्रमाणे पंढरपूरमध्येही कॉरिडॉर उभा होणार, तीन महिन्यांत कामाला सुरुवात-देवेंद्र फडणवीस

सोलापूर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या उज्जैन काशी विश्वेश्वरच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडॉरला येत्या तीन महिन्यांमध्ये कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतलं. त्यानंतर विभागीय आयुक्त पालकमंत्री जिल्हाधिकारी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांनी तयार केलेला आराखडा पाहिला आणि त्यानंतर त्यांच्या आराखड्याला हिरवा कंदील दाखवलेला आहे आतापर्यंत कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना मोबदला दिला नाही त्याच्यापेक्षा जास्त मोबदला पंढरपूर मधल्या कॉरिडॉर बाधितांना देण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यासाठी काही व्यावसायिक मालमत्ता, काही घरं ताब्यात घ्यावी लागणार आहेत. त्या लोकांचे सुद्धा योग्य पद्धतीने (पान ४ वर)

## औरंगजेब हा महाराष्ट्राला लागलेला कलंक, जी जनतेची भावना तीच आमची-उपमुख्यमंत्री शिंदे

पुणे दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- औरंगजेबाने शंभुराजेंना हाल-हाल केले. छळ केला यात त्यांची क्रूरता आपल्याला दिसली तर शंभुराजेंचे शौर्यही आपण पाहिले आहे. औरंग्या हा महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे, जी भावना जनतेची आहे तीच आमची भावना आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या ३३६ व्या बलिदान दिनानिमित्त शंभुराजेंच्या समाधीस्थळावर जात अभिवादन केले.

एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, विरोधकांनी संविधान धोक्यात आहे असे म्हणत फेक नरेटीव्ह पसरवला. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व धर्माच्या लोकांसाठी योजना आणल्या आहेत. विरोधकांच्या पोटात लोकसभा निवडणुकीनंतर दुखायला लागले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवरायांच्या गडकोटांचे संवर्धन करणे, छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास जपणं आणि त्यांचे संवर्धन करणे हे आमचे काम आहे. गडावर जी अतिक्रमण काढली गेली पाहिजे, ही शिवभक्तांची भावना हीच माझी भावना आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे शौर्याचे प्रतिक आहे. त्यांचे हे स्मारक तीर्थक्षेत्र होणार आहे. मी मुख्यमंत्री असताना ३५० -४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. वढू-तुळापूर एक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याला साजेसं या ठिकाणी तीर्थक्षेत्र होईल. हजारो-लाखो लोकं इथे येतील आणि प्रेरणा-ऊर्जा घेऊन जातील, याचे पावित्र राखले जाईल. त्यासाठी जे काही लागेल त्यासाठी सरकार कुठेही मागे पडणार नाही.

एकनाथ शिंदे म्हणाले की, शंभुराजे हे आमचे मान आणि शान आहेत. शिवरायांच्या आदर्शावर हे रयतेचे राज्य म्हणून आम्ही काम करत आहोत. मी मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांसह टीम म्हणून काम करत होतो. तर आता (पान ४ वर)

## २०३६ मधील ऑलिम्पिक स्पर्धेत काही सामने महाराष्ट्रात घ्या; रोहित पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारतामध्ये २०३६ साली होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. या स्पर्धेत काही सामने हे महाराष्ट्र घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. यासाठी त्यांनी क्रीडामंत्री आणि मुख्यमंत्री यांना लक्ष घालण्याची विनंती केली आहे. महाराष्ट्रात देखील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम आणि सोयी सुविधा आहेत. या स्पर्धा महाराष्ट्रात झाल्या तर जागतिक पातळीवर आपल्या राज्याचे नाव निश्चित मोठे होईल, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, २०३६ साली ऑलिम्पिक स्पर्धा भारतात होण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. प्रामुख्याने या स्पर्धा गुजरातमधील गांधीनगर व अहमदाबादमध्ये होणार आहेत. मात्र फुटबॉलच्या काही महत्त्वाच्या मॅचेस त्यांच्या राज्यात व्हाव्यात यासाठी गोवा राज्याचे क्रीडामंत्री प्रयत्नशील आहेत हे समजल्यानंतर एक मराठी माणूस म्हणून आपल्या महाराष्ट्रात काय कमी आहे, असे वाटते. आपल्याकडेही आंतरराष्ट्रीय दर्जाची स्टेडियम व सोयीसुविधा आहेत. त्यामुळे राज्याच्या क्रीडामंत्री व मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, केंद्र शासनाशी समन्वय साधून जास्तीजास्त क्रीडा प्रकाराचे सामने जर महाराष्ट्रात आपण घेऊ शकलो तर जागतिक पातळीवर आपल्या राज्याचे नाव निश्चित मोठे होईल.

## लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या विजयामागे मोदींचा नव्हे तर आरएसएसचा करिष्मा-विजय वडेट्टीवार

नागपूर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या विजयामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नव्हे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा करिष्मा होता. ही गोष्ट पटल्यामुळेच मोदी उद्या नागपूरच्या दौऱ्यावर येत आहेत, अशी खोचक टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या रविवारी नागपूर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते संघाच्या रेशीमबाग येथील डॉक्टर हेडगेवार स्मृती भवन परिसरासह ऐतिहासिक दीक्षाभूमीला भेट देणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत सरसंघचालक मोहन भागवतही हजर राहणार आहेत. विशेष म्हणजे देशाच्या पंतप्रधानपदावर विराजमान असताना संघाच्या मुख्यालयात जाणारे मोदी पहिलेच पंतप्रधान ठरणार आहेत. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या दौऱ्यावर निशाणा साधला आहे.

नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर पहिल्यांदाच नागपूरला येत आहेत. भाजपच्या विजयात नरेंद्र मोदी यांचा नव्हे तर संघाचा करिष्मा असल्याचे आता त्यांना पटत आहे. त्यामुळेच ते संघ मुख्यालयात येत आहेत. पंतप्रधान मोदी १२ वर्षानंतर संघ मुख्यालयात येत आहेत. म्हणजे त्यांचा प्रवास सूर्योदपासून सूर्यास्ताकडे जात आहे असेच म्हणावे लागेल, असे ते म्हणालेत. संघाचा १०० वर्षांचा इतिहास हा दोन समाजांत दरी निर्माण करणारा आहे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी संघ व मुस्लिम लीग काही काळासाठी एकत्र आले होते. संघाची भूमिका परिस्थितीनुसार बदलते. संघाचा मूळ अजेंडाच विभाजनाचा आहे. कर काँग्रेस सर्वांना सोबत घेऊन चालणारी संघटना (पान ४ वर)

## भूकंपग्रस्त म्यानमारच्या मदतीला भारत धावला!

### १५ टन जीवनावश्यक साहित्य पाठवले

नवी दिल्ली दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- म्यानमारमध्ये शुक्रवारी ७.७ रिश्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपानंतर मोठा विध्वंस झाला. दुसऱ्या दिवशी, शनिवारी म्यानमारमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर आणि भूकंपाचा केंद्रबिंदू असलेल्या मांडलेमध्ये ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरु आहे. बर्माच्या अधिकृत स्टेट मीडिया एमआरटीव्हीच्या रिपोर्टनुसार, या शक्तिशाली भूकंपामुळे १,००२ लोकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, या भूकंपामुळे मोठी जीवितहानी झाली आहे. यामुळे मृतांचा आकडा १० हजारपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे, अशी भीती युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हेने शुक्रवारी व्यक्त केली होती. दरम्यान, या नैसर्गिक आपत्तीनंतर भारत म्यानमारच्या मदतीला धावला आहे. भारताने शनिवारी ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत १५ टन मदत साहित्य म्यानमारला पाठवले. भारतीय हवाई दलाच्या ए सी-१३०जे या लष्करी वाहतूक विमानाने ही मदत यांगूनला रवाना करण्यात आली. भारताने पाठवलेल्या मदत साहित्यात तंबू, स्लीपिंग बॅग, ब्लँकेट्स, अन्नपदार्थांची पाकिटे, पाणी शुद्धीकरण यंत्र, सौर दिवे, जनरेटर सेट्स आणि औषधांचा समावेश होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी वर पोस्ट करत सांगितले की, "ऑपरेशन ब्रह्मा सुरू करण्यात आले आहे. भारताकडून मानवतावादी दृष्टीकोनातून मदतीची पहिली खेप म्यानमारमधील यांगून विमानतळावर पोहोचली आहे." ८० सदस्यांचे एनडीआरएफ पथकही म्यानमारला रवाना झाले आहे. हे पथक म्यानमारमधील बचावकार्यात मदत करेल, अशी माहिती एस. जयशंकर यांनी दिली.

## कर्जमाफीच्या आश्वासनावरून घुमजाव म्हणजे शेतकऱ्यांचा विश्वासघात-किसान सभा

अकोले दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बाबत सरकार शेतकऱ्यांचा विश्वासघात करत असल्याचा आरोप किसान सभेने केला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सरचिटणीस डॉ अजित नवले यांनी किसान सभेच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात हा आरोप करण्यात आला आहे .

शेतकऱ्यांची मतं काढून घेण्यासाठी विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. आज मात्र राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता कर्जमाफी करता येणार नाही अशी विधाने केली जात आहेत. सरकारने केलेला शेतकऱ्यांचा हा पुन्हा एकदा नवा विश्वासघात आहे. सरकारने निवडणुकीत शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पाळावे व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मागणी या पार्श्वभूमीवर किसान सभेने केली आहे.

माणसाने अंथरूण पाहून पाय पसरावे, शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी इतके मोठे अंथरूण राज्य सरकारचे सध्या नाही, असे विधानही राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी केलेले आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याएवढे मोठे अंथरूण राज्य सरकारचे नव्हते याची जाणीव निवडणुकीत शेतकऱ्यांना आश्वासन देऊन मते पदरात पाडून घेतेवेळी नव्हती का ? असा प्रश्न या पार्श्वभूमीवर उपस्थित होत आहे. मते मागत असताना आपले अंथरूण किती आहे, तितकीच आश्वासने द्यावीत, असे संबंधितांना का वाटले नाही? हा प्रश्न शेतकरी समुदायातून विचारला जात आहे.

या वर्षी व पुढील वर्षी तरी कर्जमाफीची शक्यता नाही, शेतकऱ्यांची परिस्थिती पाहून कालांतराने कर्जमाफीचा निर्णय घेऊ असेही अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती राज्य सरकारला आणि तमाम यंत्रणांना माहीत आहे. त्यामुळे प्रश्न शेतकऱ्यांची परिस्थिती पाहून कर्जमाफी करण्याचा नसून मतांची बिदागी मिळवण्यासाठी निवडणुकीचा हंगाम पाहून जमले तर कर्जमाफी करण्याचा हा मुद्दा आहे. निवडणुकांसाठी आणि मते मिळवण्यासाठी शेतकऱ्यांच्या जीवाशी होत असलेला खेळ सत्ताधाऱ्यांनी थांबवावा असे आवाहन किसान सभा करत आहे. सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या माथ्यावर झालेल्या कर्जाची संपूर्ण जबाबदारी सुद्धा सरकारची आहे. सरकारने आपली जबाबदारी स्वीकारावी, मतांसाठी निवडणुकीत दिलेले आश्वासन पाळावे व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी तत्काळ करावी अशी मागणी डॉ. अशोक ढवळे ,जे. पी. गावीत, उमेश देशमुख व डॉ. नवले यांनी केली आहे.

## शिवाजी महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका-अजित पवार

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जाती आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी कधीही जात, धर्मात भेदभाव केलेला नाही. त्यांचा एकंदरीत इतिहास पाहिला तर वेगवेगळ्या समाजातील, समाजाचे, धर्माचे, पंथाच्या लोकांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी महाराजांना मनापासून साथ दिलेली आहे. मात्र, काहीजण वेगळ्या पद्धतीने इतिहास लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करतात. कृपा करून महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका, महाराज सर्वांचे होते, असा सल्ला अजित पवार यांनी दिला आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वढू बु. येथील महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्या एका समाजाचे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांना देखील पुढील (पान ४ वर)

# गुढीपाडवा: संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते.फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य. हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे.हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला ''गुढीपाडवा''सण साजरा करतो.आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते.गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे.अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि



मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो. कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे.आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो.गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो.परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने,अ ादरतीथ्याने,प्रेमाने,मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो. त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो.वाढते प्रदूषण पहाता सर्वांनीच मास्कचा वापर करावा व आरोग्याची काळजी घ्यावी.महाराष्ट्रासह भारतात वाढते प्रदूषण पहाता व वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली,मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**- रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर
***




गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून मराठी आणि कोकणी हिंदूसाठी चंद्र सौर नववर्षाची सुरुवात करणारा वसंतोत्सव आहे. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चंद्रसौर हिंदू कॅलेंडरच्या पहिल्या महिन्याच्या चैत्राच्या सुरुवातीला हा दिवस महाराष्ट्र, गोवा आणि दमणच्या आसपास साजरा केला जातो. शालीवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहुर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढीपाडव्याच्या निमित्ताने हिंदू संस्कृतीची झलक दाखविणाऱ्या मिरवणुका काढल्या जातात. महिला, पुरुष, लहान मुले पारंपरिक पोशाखांत या मिरवणुकीत सहभागी होतात. या दिवशी पाणपोई घालावी, पाण्याने भरलेल्या घड्याचे दान करावे असाही संकेत रूढ आहे. या मंगलदिनी विविध ठिकाणी पहाटेच्या सांस्कृतिक मैफिली उत्साहाने आयोजित केल्या जातात. रसिकांचा वाढता प्रतिसाद दिवाळी पहाट, नववर्ष पहाट व गुढीपाडवा किंवा हिंदू नववर्ष पहाट या उपक्रमाला मिळत आहे.

चैत्र शुद्ध प्रतिपदेला लवकर उठतात, स्नान करतात, स्नान इ.दैनंदिन कर्मे झाल्यावर सूर्योदयानंतर ही गुढी उभारतात. या दिवशी महाराष्ट्रात लोक घराच्या प्रवेशद्वारी उंचावर गुढी उभारतात. उंच बांबूच्या काडीला कडूनिंबाची डहाळी, काढीच्या वरच्या टोकाला रेशमी वस्त्र अथवा साडी गुंडाळतात, फुलांचा हार आणि साखरेची गाढी बांधून त्यावर तांब्या/धातूचे भांडे बसवले जाते, गुढीचा बांबू पाटावर उभा केला जातो, तयार केलेली गुढी दारात, उंच गच्चीवर लावतात. गुढीला गंध, फुले, अक्षता वाहतात व निरांजन लावून उदबत्ती दाखवतात. दुपारी गोडाचा नैवेद्य दाखवून संध्याकाळी पुन्हा हळद-कुंकू फुले वाहून गुढी उतरवली जाते. यादिवशी आनंद साजरा करीत आप्तेष्टांना नववर्षाच्या शुभेच्छा, गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या जातात. चैत्र शुध्द प्रतिपदा हा दिवस कर्नाटक आणि आंध्रप्रदेश अशा गौतमीपुत्राची सत्ता असलेल्या राज्यांत स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद झाल्यामुळे विजयदिन म्हणून संवत्सर पाडवो वा उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रामुख्याने महाराष्ट्रात या सणाला गुढीपाडवा असे संबोधले जाते. सिंधी लोक चेटीचंड नावाने या उत्सवाला संबोधतात.

वर्षप्रतिपदेच्या दिवशी विघ्नहर्त्या गणपतीचे, देवादिकांचे स्मरण, पूजन करतात. गुरू, वडीलधाऱ्यांना वंदन करावे, अशीही रूढी आहे. त्यानंतर संवत्सर फल श्रवण करावे, असा संकेत रूढ आहे. संवत्सर फल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती - जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूर्याचे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भांवरून हे संवत्सर फल दिलेले असते. संवत्सर फलात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फलात त्रोटकपणे सांगितलेले असते. वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते. म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते. साठ संवत्सरांची वेगवेगळ्या पद्धतीने विभागणी केली आहे. एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात. तसेच संवत्सर चक्रातील ८ व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७ व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते. ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती 'प्रतिपदा' म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला 'युगादी' तिथी असेही म्हणतात.

तेलगु भाषेत गुढी या शब्दाचा अर्थ 'लाकूड अथवा काठी' असा आहे तसाच तो 'तोरण' असाही आहे. दाते, कर्वे लिखित 'महाराष्ट्र शब्दकोशा'चा आधार घेतला तर गुढ्या या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्या शब्दकोशाने खोपटी, झोपडी, अथवा पाल असा दिला आहे. हिंदीत कुडी या शब्दाचा एक अर्थ लाकूड उभे करून उभारलेली कुटी अथवा झोपडी असा होतो. राहण्याची जागा या अर्थाने 'गुडी' हा शब्द येऊन दक्षिणेतली आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू खासकरून आंध्रातील गावांच्या नावांची संख्या अभ्यासली असता लाकूड या अर्थाने तेलगूतील 'गुढी' या शब्दाचा अधिक वापर आणि जुन्या मराठीतील लाकूड बांबू/काठी ने बनवलेले घर, हे पाहता हा शब्द महाराष्ट्र आणि आंध्र या प्रदेशात गुढी शब्दाचा प्रचार अधिक असावा. शालिवाहनपूर्व काळात कदाचित गुढीचा लाकूड बांबू/काठी हा अर्थ महाराष्ट्रीयांच्या शब्द संग्रहातून मागे पडला असावा पण आंध्रशी घनिष्ट संबंध असलेल्या शालिवाहन राजघराण्याच्या लाकूड बांबू/काठी या अर्थाने तो वापरात राहिला असण्याची शक्यता असू शकते.

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मतभेद आहे. याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे तो असा - अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रातःकाळी ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे, धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधी गुण ह्या कडुनिंबाच्या अंगी आहेत असे आयुर्वेदात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते. मध्ययुगात हा उत्सव राजा अथवा त्याच्या अधिकाऱ्याकडून साजरा केला जात असे. सात गावांचा अधिपती असलेली व्यक्तीही हा उत्सव संपन्न करीत असे. आता घरोघरी हा उत्सव साजरा होतो. सर्वांना गुढीपाडवा व नूतन वर्षाच्या मंगलमय शुभेच्छा!

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
***

# बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण - रमजान !

ईद हा आनंदाचा सण आहे जरी हा प्रामुख्याने इस्लामचा सण असला तरी, आज जवळजवळ सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. खरं तर या सणापूर्वी सुरू होणाऱ्या पवित्र रमजान महिन्यात, इस्लाम धर्माचे लोक संपूर्ण महिनाभर उपवास ठेवतात. मुस्लिमांनी या महिन्यात उपवास ठेवणे अनिवार्य आहे कारण त्यांचा असा विश्वास आहे की यामुळे अल्लाह प्रसन्न होतो. हा सण एखाद्याच्या धर्माप्रती त्याग आणि समर्पणाचे प्रतिबिंबित करतो. हे दाखवते की मानवाने आपल्या मानवतेसाठी आपल्या इच्छांचा त्याग केला पाहिजे जेणेकरून एक चांगला समाज निर्माण करता येईल. ईद-उल-फित्र एक दिवस आधी चंद्र पाहून निश्चित केला जातो. सौदी अरेबियामध्ये एक दिवस आधी आणि भारतात एक दिवस नंतर चंद्र दिसत असल्याने ईद दोन दिवस साजरी केली जाते. ईद हा एक महत्त्वाचा सण आहे म्हणून या दिवशी सुट्टी असते. ईदच्या दिवशी सकाळपासून त्याची तयारी सुरू होते.



रमजानचा चंद्र मावळल्यानंतर आणि ईदचा चंद्र दिसल्यानंतर पहिल्या दिवशी मुस्लिम धर्मियांचा ईद हा सण साजरा केला जातो, ही इस्लाममधील दोन ईदांपैकी एक आहे. इसवी सन् ६२४ मध्ये बद्रच्या लढाईनंतर पैगंबर मुहम्मद यांनी पहिली ईद उल-फित्र साजरी केली. ईद उल फित्रच्या निमित्ताने अल्लाहचे श्रद्धावान संपूर्ण महिना अल्लाहची पूजा करतात, उपवास ठेवतात आणि कुराण पठण करून त्यांचे आत्मे शुद्ध करतात, ज्याचे बक्षीस किंवा वेतन मिळण्याचा दिवस ईदचा दिवस म्हणून ओळखला जातो, जो जगभरातील मुस्लिम मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतात. ईद उल-फित्रचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे गरिबांना फित्र देणे बंधनकारक आहे, जेणेकरून जे लोक गरीब आहेत आणि त्यांची ईद साजरी करण्यास भाग पाडले आहेत, ते नवीन कपडे घालू शकतील आणि समाजात एकमेकांसोबत आनंद वाटू शकतील. ज्यांच्याकडे ५२.५० तोळा चांदी किंवा ७.५० तोळा सोने आहे त्यांच्यावर फित्र अनिवार्य आहे. त्यांनी स्वतःसाठी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलांसाठी सदका-ए-फित्र द्यावे, जे ईद-उल-फित्रच्या नमाजपूर्वी करावे लागेल. ईद हा बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण आहे, ईदच्या दिवशी लोक एकमेकांच्या हृदयातील प्रेम वाढवण्यासाठी आणि द्वेष दूर करण्यासाठी एकमेकांना मिठी मारतात.

रमजान हा इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, ज्यात कुराण इस्लामी संदेष्टा मुहम्मद यांना अवतरले आहे. जगभरातील मुस्लिम प्रार्थना, प्रतिबिंब आणि समुदाय, उपवासाचा महिना (सॉम) म्हणून पाळतात. मुहम्मद (सल्ल)च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून रमजान महिन्यातील उपवास हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक आहे आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे हे सर्व प्रौढ मुस्लिमांसाठी अनिवार्य आहे, त्यामुळे ते या महिन्यात मुस्लिम लोक पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत दिवसाच्या प्रकाशात उपवास करून घालवतात. जे तीव्र किंवा दीर्घकाळ आजारी नसलेले, प्रवास करणारे वृध्द, स्तनपान करणारे मधुमेह किंवा मासिक पाळीत आहेत. पहाटेच्या जेवणाला सुहूर असे संबोधले जाते आणि रात्रीच्या जेवणाला इफ्तार म्हणतात. मध्यरात्री सूर्य किंवा ध्रुवीय रात्र असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या मुस्लिमांनी मक्काचे वेळापत्रक पाळावे, असे फतवे जारी केले गेले असले तरी सर्वात जवळच्या देशाचे वेळापत्रक पाळण्याची प्रथा आहे, ज्यात रात्र दिवसापासून वेगळी केली जाऊ शकते. असे मानले जाते की उपवासाचे आध्यात्मिक बक्षिसे रमजानमध्ये वाढतात. त्यानुसार मुस्लिम केवळ खाण्यापिण्यापासूनच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थ, लैंगिक संबंध आणि पापी वर्तनापासूनही परावृत्त करतात, नमाज आणि कुराण पठण करण्याऐवजी स्वतःला समर्पित करतात.

उपवास संपल्याच्या आनंदाव्यतिरिक्त, या ईदच्या दिवशी मुस्लिम अल्लाहचे आभार मानतात कारण अल्लाहने त्यांना महिनाभर उपवास ठेवण्याची शक्ती दिली. तथापि, उपवास करून मोक्ष कधीच शक्य नाही कारण पवित्र शास्त्रांमध्ये त्याचा उल्लेख नाही. पवित्र कुराण शरीफमध्ये बख्बर संतांकडून योग्य उपासनेचा मार्ग स्वीकारून पूर्ण मोक्ष मिळविण्यासाठी सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करण्याची सूचना देखील दिली आहे. ईदच्या काळात कुटुंब आणि मित्रांमध्ये भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. शेवई हा या सणातील सर्वात महत्त्वाचा पदार्थ आहे, जो प्रत्येकजण मोठ्या आवडीने खातात. ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिमाने मशिदींमध्ये सकाळच्या नमाजपूर्वी दान किंवा दान करणे बंधनकारक आहे, या देणगीला 'जकात उल-फित्र' म्हणतात. हे दान कोणत्याही दैनंदिन अन्नपदार्थाचे दोन किलोग्रॅम असू शकते, उदाहरणार्थ पीठ किंवा त्या दोन किलोग्रॅमच्या किमतीचे देखील. त्यानंतर ही जकात गरिबांमध्ये वाटली जाते.

इस्लामी दिनदर्शिका चंद्रावर अवलंबून आहे, जिथे प्रत्येक महिन्याची सुरुवात होते, जेव्हा नवीन चंद्राची पहिली चंद्रकोर दिसते. इस्लामी वर्षात १२ चंद्र चक्रे असतात आणि परिणामी ते सौर वर्षापेक्षा १० ते ११ दिवस लहान असते आणि त्यात कोणतेही अंतर नसल्यामुळे रमजान संपूर्ण ऋतूंमध्ये स्थलांतरित होते. इस्लामी दिवस सूर्यास्तानंतर सुरू होतो. अनेक मुस्लिम रमजानच्या सुरुवातीस चंद्राच्या स्थानिक भौतिक दर्शनाचा आग्रह धरतात, परंतु इतर लोक महिन्याची सुरुवात निश्चित करण्यासाठी नवीन चंद्राची गणना केलेली वेळ किंवा सौदी अरेबियाची घोषणा वापरतात. जागतिक स्तरावर नवीन चंद्र एकाच वेळी एकाच स्थितीत नसल्यामुळे, रमजानच्या सुरुवातीच्या आणि समाप्तीच्या तारखा प्रत्येक संबंधित स्थानावर कोणत्या चंद्राचे दर्शन घेतात यावर अवलंबून असतात. परिणामी रमजानच्या तारखा वेगवेगळ्या देशांमध्ये बदलतात परंतु सामान्यतः फक्त एका दिवसाने, हे चंद्राच्या चक्रामुळे होते. चंद्र मेण चंद्रकोर म्हणून पात्र होण्यासाठी निकष पूर्ण करू शकत नाही, जे एका ठिकाणी सूर्यास्ताच्या वेळी आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी भेटेल तेव्हा महिन्यांतील बदलाचे वर्णन करते. खगोलशास्त्रीय अंदाज जे रमजानची सुरुवात अंदाजे उपलब्ध आहेत.

इस्लामच्या मते कुराण या महिन्यात सर्वात खालच्या स्वर्गात पाठवण्यात आले होते, अशा प्रकारे जिब्राईलने मुहम्मद यांना हळूहळू प्रकटीकरणासाठी तयार केले होते. म्हणून मुहम्मद यांनी आपल्या अनुयायांना सांगितले की स्वर्गाचे दरवाजे संपूर्ण महिनाभर उघडे राहतील आणि नरकाचे दरवाजे (जहन्नुम) बंद होतील. पुढील महिन्याचे पहिले तीन दिवस, शव्वाल, उत्सवात घालवले जातात आणि 'ब्रेकिंग फास्टचा सण' किंवा ईद अल-फितर म्हणून साजरा केला जातो. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या या पवित्र प्रसंगी अल्लाह तुम्हा सर्वांना आनंद देवो आणि तुमच्या प्रार्थना स्वीकारो, सर्वांना ईद-ए-मिलाद-उन-नबी मुबारक!

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
****

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)



जुन्या दु:खांना मागे सोडून
स्वागत करा नववर्षाचे
गुढीपाडवा घेऊन येतो क्षण
प्रगती आणि हर्षाचे..!

# हिंदू नववर्ष व गुढी पाडवा

निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!

दैनिक
वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं
ग्लोबल भारत
dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com

dailyglobalbharat@gmail.com

दैनिक **ग्लोबल भारत**

www.globalbharatlive.com



### इलेक्ट्रीक वाहन रॅलीतून केली जनजागृती

# अर्थिक बचत व पर्यावरण संवर्धनासाठी अपारंपारिक ऊर्जा वापरास चालना द्यावी-अपारंपारिक ऊर्जा मंत्री सावे

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- देशाच्या ऊर्जानिर्मितीतील अधिक भाग हा कोळसा आणि पेट्रोलियम इंधनांवर खर्च होतो. हे इंधन आयात करावे लागत असल्याने देशाची परकीय चलनाची गंगाजळीतील मोठा हिस्सा खर्च करावा लागतो. ही बचत करण्यासाठी सौर ऊर्जा व अपारंपारिक ऊर्जेचे अन्य पर्यायांचा वापर करण्यास चालना देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण आहे. त्यास चालना देण्यासाठी नागरिकांनी पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर करावा,असे आवाहन अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज येथे केले.



महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण आणि ऊर्जा दक्षता ब्युरो यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रिक वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले. टीव्ही सेंटर मैदानापासून या रॅलीस प्रारंभ झाला. महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक विनोद सिरसाट, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, उपवनसंरक्षक प्रमोद लाकरा, महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, महेंद्र ढवले, प्रकाश पेटवडेकर, किशन धोत्रे आदी उपस्थित होते.

श्री. सावे म्हणाले की, ऊर्जेची बचत करणे म्हणजेच ऊर्जेचे उत्पादन करणे होय. मोठ्या प्रमाणावर आपल्या देशाला इंधन आयात करावे लागते. त्यामुळे पर्यायी ऊर्जेचा वापर करुन ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे हे आपल धोरण आहे. त्यानुसार मुख्यमंत्री फडणवीस यांनी आता लोकप्रतिनिधींनाही इलेक्ट्रीक वाहने वापरण्यास सांगितले आहे. अशाप्रकारे आयात इंधन वापरास पर्याय उपलब्ध करुन आपण परकीय चलनाचीही बचत करु शकतो,असे सावे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की. छत्रपती संभाजीनगर हे क्षेत्र इलेक्ट्रीक वाहनांच्या निर्मितीत अग्रेसर आहे. देशातील अग्रगण्य उद्योजक या ठिकाणी इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे उद्योग उभारत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.

प्रास्ताविक विनोद शिरसाट यांनी केले. श्री. सावे यांच्या हस्ते झेंडी दाखवून रॅली रवाना करण्यात आली. या रॅलीत मोटार सायकल, तीन चाकी रिक्षा, मालवाहू वाहने,हातगाडी, बसेस, कार अशा विविध ३५० हून अधिक ईलेक्ट्रिक वाहनांनी सहभाग घेतला. क्रांती चौकात रॅलीचा समारोप झाला.

# नागरिकांच्या तक्रारी, सार्वजनिक समस्यांच्या जलद निराकरणासाठी प्रसिद्धी माध्यमांची होणार मदत

## माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांची माहिती

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नागरिकांच्या तक्रारी आणि सार्वजनिक समस्यांविषयी विविध माध्यमांमधून प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांना त्वरित प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने आज महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाद्वारे विविध माध्यमातून प्रसिद्ध होणाऱ्या शासनविषयीच्या महत्त्वपूर्ण बातम्यांची दखल घेऊन त्याद्वारे शासनाची कार्यक्षमता वाढवून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव आणि महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी दिली.

**प्रमुख वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टे**

माध्यमांमधून प्रसिद्ध होणाऱ्या विविध बातम्यांची शासकीय विभागांकडून तात्काळ दखल घेण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांच्या तक्रारी, समस्यांच्या निराकरणासाठी मदत होणार आहे. कार्यक्षम सेवा, वितरण यंत्रणा, समस्यांचे जलद निराकरण करणे याकरिता माध्यमांमधून प्रसिद्ध होणारी माहिती तथा बातम्यांची महत्त्वपूर्ण मदत घेता येणार आहे.

**परिपत्रकाचा प्रमुख उद्देश**

* माध्यमांशी संवाद वाढविणे
* नागरिक-शासन दुवा मजबूत करणे
* पारदर्शक संवाद प्रक्रिया राबविणे
* नियमित माहितीची देवाण-घेवाण करणे

**कार्यपद्धती**

* प्रत्येक विभागात नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती
* बातम्यांची त्वरित दखल
* साप्ताहिक कृती अहवाल
* मासिक पुनर्विलोकन बैठका

**अपेक्षित परिणाम**

* बातम्यांची त्वरित दखल घेऊन जलद तक्रार निवारण
* नागरिकांच्या समाधानात वाढ
* प्रशासकीय कार्यक्षमता वृद्धी
* सुशासन, प्रतिमा बळकटीकरण

**माध्यमांमधील माहितीची त्वरित दखल**

"हे परिपत्रक म्हणजे पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे माध्यमांमधून प्रसिद्ध होणारी माहिती आणि बातम्यांची दखल घेऊन त्याद्वारे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अधिक प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होईल, असे श्री. सिंह यांनी सांगितले.

# पायोनियर भारतात कारमधील उत्पादनांचे उत्पादन सुरू करणार आहे

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पायोनियर कॉर्पोरेशनने आज घोषणा केली की ते २०२६ मध्ये भारतात कारमधील उत्पादनांचे उत्पादन सुरू करतील. २०२३ मध्ये देशात संशोधन आणि विकास केंद्राची स्थापना झाल्यानंतर, या धोरणात्मक पुढाकारामुळे पायोनियर ग्रुपची भारतातील उपस्थिती आणि स्थान आणखी मजबूत होईल, जिथे ऑटोमोटिव्ह उद्योग क्षेत्रात दरवर्षी उल्लेखनीय वाढ होत आहे.

"गतिमान अनुभवांचे भविष्य निर्माण करणे" या कॉर्पोरेट व्हिजन अंतर्गत, पायोनियर स्वतःला एक सोल्यूशन्स कंपनीमध्ये रूपांतरित करण्यासाठी आपले प्रयत्न वाढवत आहे.शिवाय, कंपनी जागतिक क्षेत्रात एक मेजर प्लेयर बनण्याच्या दिशेने पावले उचलत आहे, ज्यामध्ये बाहेरून अधिकारी आणि उद्योगातील दिग्गजांना आणणे आणि भारत आणि जर्मनीमध्ये संशोधन आणि विकास सुविधा स्थापन करणे समाविष्ट आहे.

पायोनियर भारताला जपानबाहेर त्यांच्या प्राधान्य बाजारपेठांपैकी एक मानते. स्थानिक कंत्राटदारांच्या सहकार्याने कारमधील उत्पादनांचे स्थानिक उत्पादन सुरू केल्याने, आम्हाला देशात एंड-टू-एंड व्हॅल्यू चेन स्थापन करण्यात येईल, ज्यामध्ये बी२बी विक्री आणि संशोधन आणि विकास ते उत्पादन आणि डिलिव्हरीनंतरच्या गोष्टींचा समावेश असेल. यामुळे आम्हाला भारतीय वाहन उत्पादकांसोबत आमचा व्यवसाय मजबूत करण्याची एक उत्तम संधी मिळेल. विशेषतः, उत्पादन डिझाइन आणि उत्पादनात स्थानिक गरजा पूर्ण करण्यात मदत होईल, डिलिव्हरीचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करून आणि गरज पडल्यास विक्रीनंतरची सेवा आम्ही त्यांना अधिक चांगल्या प्रकारे देऊ शकू. ऑटोमेकर्ससाठी डिस्प्ले ऑडिओ उत्पादनांसह स्थानिक उत्पादन सुरू करण्याचे नियोजन आहे आणि आम्ही फॅक्टरी इन्स्टॉलेशन आणि रिटेल चॅनेल दोन्हीसाठी कारमधील उत्पादनांची विस्तृत श्रेणी समाविष्ट करण्यासाठी उत्पादनाची रेंज वाढवण्याचा विचार करू.

या धोरणात्मक निर्णयावर भाष्य करताना, पायोनियर कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि सीईओ शिरो याहारा म्हणाले, "भारतात कारमधील उत्पादनांचे उत्पादन सुरू करण्यास आम्ही उत्सुक आहोत. स्थानिक उत्पादनाकडे वळल्याने आम्हाला स्थानिक वाहन उत्पादकांना त्यांच्या घराच्या जवळ चांगली सेवा देता येईल. वेगाने वाढणाऱ्या भारतीय ऑटो उद्योगातील प्रमुख खेळाडूंपैकी एक बनणे आणि दीर्घकालीन आमच्या जागतिक व्यवसायाच्या वाढीला चालना देणे हे पायोनियरसाठी एक मोठे पाऊल आहे."

# एबीएच ट्रीलँड येथे नाशिकमधील पहिली एआय सक्षम स्मार्ट कार व्यवस्थापन प्रणाली लॉन्च करण्यासाठी पार्क+नेएबीएच डेव्हलपर्स सोबत भागीदारी केली

नाशिक दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नाशिकमधील आघाडीचे रियल इस्टेट विकासक एबीएच डेव्हलपर्स यांनी एबीएच ट्रीलँड, गंगापूर रोड, सरीन मेडोज जवळ, जलालपूर, नाशिक येथील निवासी कार मालकांसाठी, नाशिकमध्ये प्रथमच एआयसक्षम स्मार्ट ॲक्सेस कंट्रोल सिस्टम लॉन्च करण्यासाठी भारतातील आघाडीची स्मार्ट वाहन व्यवस्थापन प्रणाली प्रदाता पार्क+ यांच्याशी हातमिळवणी केली आहे. पार्क+ एआयसक्षम स्मार्ट ॲक्सेस कंट्रोल सिस्टम बसवल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमीत कमी राहील, वाट बघण्याची वेळ बरीच कमी होईल आणि एबीएच ट्रीलँडमध्ये राहणाऱ्या कार मालकांना खराखुरा डिजिटल अनुभव मिळू शकेल.

पार्क+चे संस्थापक आणि सीईओ अमित लखोटिया म्हणाले, "यूझर्सना कारच्या मालकीचा अधिक चांगला अनुभव देण्यासाठी पार्क+ ॲप समान विचारसरणीच्या ब्रँड्सशी भागीदारी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत असते. या धोरणाचा एक भाग म्हणून,एआय सक्षम स्मार्ट कार व्यवस्थापन प्रणाली नाशिकमध्ये आणण्यासाठीएबीएच डेव्हलपर्सशी भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. पार्क+ मध्ये आम्ही असे एक काम हाती घेतले आहे, ज्याची एरव्ही आपल्याला भीती वाटते- निवासी सोसायट्यांमध्ये एंट्री/एक्झिट आणि निवासी सोसायट्यांच्या आत वाहनांची सुरक्षा सुनिश्चित करणे. स्मार्ट एआय सक्षम बूम बॅरियर्स विकसित करून आम्ही एंट्री / एक्झिटचा अनुभव संपूर्णपणे डिजिटाईझ केला आहे. हे बॅरियर्स आमच्या आरएफआयडी टॅगचा / एएनपीआर कॅमेऱ्यांचा ट्रॅक ठेवतात आणि सोसायटीमध्ये राहणाऱ्या निवासी कार मालकांना उत्कृष्ट अनुभव देतात. आमचा उद्देश नाशिकमध्ये प्रत्येक निवासी सोसायटीला कार मालकांसाठी स्मार्ट आणि सुरक्षित बनवण्याचा आहे."

प्रस्तुत भागीदारीविषयी टिप्पणी करताना एबीएच डेव्हलपर्सचे संचालक प्रशांत बागमार म्हणाले, "आमच्या सर्व रियल इस्टेट डेव्हलपमेंट्समध्ये आधुनिक टेक्नॉलॉजीचा समावेश करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. एबीएच ट्रीलँडमध्ये एआयसक्षम स्मार्ट कार व्यवस्थापन प्रणाली आणण्यासाठी पार्क+शी भागीदारी करताना आम्ही रोमांचित आहोत. या टेक्नॉलॉजी सह एबीएचट्रीलँड नाशिकमधील पहिले स्मार्ट निवासी संकुल बनेल."

पार्क+ ॲप डाउनलोड करून यूझर्स फास्टॅग रीचार्ज सारख्या पार्क+ सेवांचा लाभ घेऊ शकतात तसेच कार विम्याची ऑफर शोधू शकतात, कार मेंटेनन्स पार्टनर शोधू शकतात, सवलतीत फ्यूएल व्हाऊचर खरेदी करू शकतात, कार लोनसाठी नोंदणी करू शकतात आणि आपले चलन ट्रॅक करू शकतात.

पार्क+ विषयी: २०१९ मध्ये स्थापित झालेले पार्क+ कारच्या मालकांसाठीचे एक सुपर ॲप आहे, जे त्यांच्या दैनंदिन समस्यांवर उपाययोजना करते, जसे की, पार्किंग आणि फास्टॅग व्यवस्थापनापासून ते कारचा विमा, ऑटोमेटेड व्हेइकल ॲक्सेस कंट्रोल सिस्टम्स आणि चार्जिंग स्टेशन्स. सिकोईया कॅपिटल आणि मॅट्रिक्स पार्टनर्स यांचा पाठिंबा असलेले पार्क+ आज आपल्या मंचावर देशातील कार मालकांच्या सर्वात मोठ्या समुदायाचे आयोजन करते. पार्क+ भारतातील ३०+ शहरांमधील १०,०००+ निवासी सोसायट्या, २५०+ कार्यालये आणि ३५+ मॉल्समध्ये वापरले जाते.

# मत्स्यव्यवसाय विकासासाठी एकात्मिक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण करण्यासंदर्भात सादरीकरण

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्याला ७२० किलोमीटर सागरी किनारा लाभला आहे. सागरी किनाऱ्यालगतच्या पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आदी जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय विकासासाठी एकात्मिक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण करण्यासंदर्भात मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले सादरीकरण करण्यात आले.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री यांच्या कार्यालयातील दालनात मत्स्यव्यवसाय विकासासाठी भारतातील पहिले एकात्मिक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण करण्यासंदर्भातील बैठकीत हे सादरीकरण करण्यात आले. यावेळी पदुमचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. मत्स्यव्यवसाय विभागाचे उपसचिव किशोर जकाते, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, मत्स्यव्यवसाय महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अनिता मेश्राम, मत्स्यव्यवसायचे सहआयुक्त महेश देवरे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य अभियंता श्री. पोपटे, एआरके कंपनीचे प्रतिनिधी ऋषी वैद्य, विक्रम शर्मा, पंजाब नॅशनल बँकेच्या प्रतिनिधी नेहा अरोरा आदी मान्यवर उपस्थित होते.

सागरी किनाऱ्यालगतच्या जिल्ह्यांमध्ये मत्स्यव्यवसाय विकासासाठी एकात्मिक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण झाल्यास अशा प्रकारच्या सेझमधील तो जिल्हा देशातील पहिला जिल्हा ठरणार आहे. असे क्षेत्र निर्माण करण्यासाठी सागरी किनाऱ्या लगतची ७५० एकर जमीन लागणार आहे. सागरी किनाऱ्यालगत या प्रकल्पातून अंदाजे २५ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

या एकात्मिक आर्थिक क्षेत्रातून रोजगार निर्मितीसह पर्यटन, आदरातिथ्य क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस चालना मिळणार असल्याचे सादरीकरणात सांगण्यात आले. मत्स्यव्यवसाय विकासासाठी एकात्मिक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड, मालवण, वेंगुर्ला, विजयदुर्ग आणि पालघर जिल्ह्यातील जलसाफळे तर रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ तसेच रायगड जिल्ह्यातील करंजे या ठिकाणांचा संयुक्तरित्या अभ्यास करावा असे मंत्री श्री. राणे यांनी यावेळी सांगितले.

# अहिल्यानगरमधील खर्डा किल्ल्याच्या जतन प्रक्रियेच्या कार्यवाहीस गती देण्याचे सभापती प्रा.राम शिंदे यांचे निर्देश

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- अहिल्यानगरमधील खर्डा किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरूस्ती करण्याकरिता बगीचा, सुशोभीकरण, संरक्षण भिंत, दरवाजा या बाबींचा नव्याने समावेश करून फेरनिविदा काढण्यात यावी. जलदगतीने काम पूर्ण करण्यासंदर्भातील कामकाजाचा अहवाल पुढील एक महिन्यात सादर करण्याचे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

जामखेड तालुक्यातील खर्डा किल्ल्याच्या स्मारकाच्या जतनासंदर्भात विधीमंडळ येथे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी खर्डा किल्ल्याच्या दुरूस्तीसंदर्भातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा तसेच गाव स्तरावर असलेल्या महावारसा समिती तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचना स्मारकाची डागडुजी व जतन करताना विचारात घ्याव्यात, असे निर्देश यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

सभापती प्रा.शिंदे म्हणाले की, स्मारकाच्या ठिकाणी किल्ल्याच्या खंदकातील उर्वरीत भिंत, बुरूज, खोल्या यांची दुरूस्ती व संवर्धन करणे, तसेच प्रवेश दरवाजा बांधणे, संरक्षित भिंत उभारणे, रोशणाई या बाबींचा समावेश करून फेरनिविदा काढण्यात याव्यात व जतन व दुरूस्तीच्या कामांस गती द्यावी.

यावेळी विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, पुरातत्व वस्तु संग्रहालय संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे, सहायक संचालक अमोल गोरे यावेळी उपस्थित होते.

पान १ वरून

### करुणा शर्माशी अधिकृत लग्न केले...

अर्ज केला, असे ते म्हणाले.

या युक्तिवादानंतर करुणा शर्मा यांच्या वकिलांनी धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांचे १९९८ साली लग्न झाल्याचा दावा केला. मुंडे व करुणा शर्मा यांचे १९९८ साली लग्न झाले. या लग्नानंतर त्यांना अपत्यप्राप्ती झाले. त्यांचे एकत्र फोटोही आहेत, असे ते म्हणाले. त्यावर कोर्टाने त्यांना या प्रकरणी तुमच्याकडे कोणते पुरावे आहेत? असा सवाल केला. त्यावर आम्ही हे सगळे पुरावे सादर करू, पण आम्हाला वेळ हवा आहे, असे ते म्हणाले. त्यानंतर कोर्टाने त्यांना पुढील तारखेपर्यंत पुरावे सादर करण्याचे आदेश देत सुनावणी ५ एप्रिलपर्यंत स्थगित केली.

### कुणाल कामराविरुद्ध ३ नवीन...

आहे. कुणालने याचिकेत म्हटले होते की, तो तामिळनाडूच्या विल्लुपुरम जिल्ह्यातील रहिवासी आहे. जर मी मुंबईत परत गेलो तर मुंबई पोलिस मला अटक करतील. त्याला शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून जीवे मारण्याचा धोका आहे.

खरंतर, कुणाल कामराने एका स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये एक विडंबन केले होते ज्यामध्ये शिंदे यांना देशद्रोही म्हटले होते. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे.

### राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक....

सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे.

देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.

ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५० /- प्रती दिन प्रती देशी गाय असे आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र आहेत. संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंशीय पशुधन असणे आवश्यक आहे. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग करणे अनिवार्य आहे. ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र आहे. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

### उज्जैनप्रमाणे पंढरपूरमध्येही....

पुनर्वसन केलं जाईल. त्यांना चांगला मोबदला दिला जाईल. आषाढीपूर्वी काही काम सुरू होतील आणि आषाढीच्या नंतर यातली काही काम सुरू होतील अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

रायगड किल्ल्यावरील वाघ्या कुत्र्याचा पुतळा हटवण्यावरून मुख्यमंत्री यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये वाद करण्याची गरज नाही. धनगर आणि मराठा असा वाद करणे योग्य नाही. संभाजीराजे जर म्हणत असतील मी त्यांना वेळ देत नाही तर ते चुकीचं आहे असं सांगत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. संभाजीराजेंशी मी फोन वर बोलतो आणि तसेच प्रत्यक्षही भेटत असतो असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

अजितदादांनी कर्जमाफी बाबत घेतलेली भूमिका योग्य आहे आणि तीच सरकारची भूमिका आहे. अजितदादांनी कर्जमाफी कधीही शक्य नाही असं वक्तव्य केलं नाही असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी त्यांची पाठराखण केली.

### औरंगजेब हा महाराष्ट्राला...

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मी, अजित पवार त्यांची टीम म्हणून काम करतोय.

एकनाथ शिंदे म्हणाले की, आमचे सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहणारे सरकार आहे. मी मुख्यमंत्री असताना सोळा हजार कोटी रुपये अवकाळी अतिवृष्टी गारपीटचे अडीच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना दिले. ४५ हजार कोटी रुपये जोडधंदे, मदत शेतकरी सन्मान योजना मार्फत दिले. आम्ही जे आश्वासन दिले आहे ते प्रत्येक आश्वासन आम्ही पूर्ण करणार आहोत. लाडक्या बहिणींना २१०० रुपये दिले जातील. विरोधकांनी सुधारणा करण्याची गरज आहे. त्यांच्याकडे विरोधी पक्षनेता होण्यासाठी लागणारे आकडे नाहीत. हे बोलून करणारे सरकार आहे, दिलेला शब्द पाळणारे हे सरकार आहे.

### लोकसभा निवडणुकीतील...

आहे. याऊलट संघाची विचारधारा विशिष्ट विचाराला घेऊन चालणारी आहे. त्यामुळे १०० वर्ष पूर्ण होत असल्याने संघाची पुढील भूमिका बदलेल अशी अपेक्षा आहे, असेही विजय वडेट्टीवार यावेळी बोलताना म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारंवार होणाऱ्या अपमानावर भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केलेल्या संतापावरही भाष्य केले. त्यांनी उदयनराजे यांचा संताप योग्यच असल्याचा दावा केला. उदयनराजे कधी - कधी खरे बोलतात. त्यांच्या मनात राग आला की ते खरे बोलतात. भगतसिंह कोश्यारींपासून महाराजांचा अपमान करणाऱ्यांची यादी काढली, तर किती व कुणावर कारवाई झाली? हे सरकार महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना सातत्याने पाठिशी घालत असल्याचे चित्र आहे, असे ते म्हणाले.

### शिवाजी महाराजांना एका....

काळामध्ये केवळ ९ वर्षे मिळाली. मात्र त्यांनी देखील अशाच पद्धतीने काम केले. त्यांची औरंगजेबाने भीती मनात घेतलेली होती. शौर्य कसे असावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे संभाजी महाराज होते. त्यावेळी वेगळ्या मार्गाने आपल्यातील लोकांनी फितुरी केली आणि त्यातून जो इतिहास घडला तो सर्वांपुढे असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

फुले-शाहू-आंबेडकरांची यांची विचारधारा जशी आहे, ज्यात सर्व जाती धर्मातील लोकांना बरोबर घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, सर्वांनी साथ द्यावी, त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. यातूनच कायदा व्यवस्था सुव्यवस्था महाराष्ट्र मध्ये चांगली राहण्यास मदत होईल, असे देखील अजित पवार म्हणाले. त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचेही ते म्हणाले.

# विमानतळ प्रांगणात बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण उत्साहात

## जनकल्याणासाठी सगळ्यांचा सहयोग आवश्यक-उद्योगमंत्री उदय सामंत

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जनसामान्यांच्या कल्याणासाठी शासन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन काम करत आहे. बुद्धा पुढे नतमस्तक होऊन जनकल्याणाच्या प्रयत्नात सगळ्यांनी सहयोग द्यावा,असे आवाहन आज उद्योग मंत्री उदय सामंत यांनी येथे केले. येथील विमानतळाच्या प्रांगणात 'भिमता' (Buddhist Indusatrial Maufacturers And Traders Association) या संस्थेच्या वतीने साकारण्यात आलेल्या बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण सोहळ्यासाठी श्री. सामंत आले होते. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, भिमता चे अध्यक्ष मिलिंद थोरात आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. सामंत म्हणाले की, जगाला अहिंसेचा संदेश भगवान बुद्धांनी दिला. जनतेचे दुःख दुर करण्यासाठी त्यांनी खडतर तप केले. अशा या बुद्धा पुढे नतमस्तक होऊन सगळ्यांनी शासनाने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जे जनकल्याणाचे कार्य आरंभले आहे त्यात आपला सहयोग द्यावा. लोकांना त्रास देऊन, बदनामी करुन काहीही साध्य होत नाही. जातीवर नव्हे कर्तृत्वावर श्रेष्ठत्व ठरत असतं. शासन अशा सर्व समाज घटकांसोबत आहे. उपेक्षितांच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत आहे, असे त्यांनी सांगितले. 'भिमता', संस्थेला प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागा देण्यासंदर्भात लवकरच मान्यता प्रदान करु अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. तसेच 'भिमता' या संस्थेने बुद्ध मुर्ती स्थापनेसाठी केलेले प्रयत्न व संस्थेचे उद्योग क्षेत्रातील कार्य याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गारही काढले. श्री.सावे म्हणाले की, भगवान बुद्धांचे शांतीचे विचार प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी आपल्या सगळ्यांना प्रयत्न करायचे आहेत. येथे येणारा प्रत्येक प्रवासी शहरात येतांना या बुद्धमुर्तीकडे पाहून शांतीचे विचार घेऊन येईल. भगवान बुद्धांच्या कार्याची माहितीही याठिकाणी प्रदर्शित करावी,अशी सुचना त्यांनी केली. पालकमंत्री शिरसाट म्हणाले की. बुद्ध मुर्तीचे अनावरण झाले, ही आनंदाची बाब आहे. बुद्धाचे शांती आणि करुणेच्या विचारांची प्रेरणा आपण साऱ्यांनी घ्यायला हवी. येथे येतांना या मुर्तीला वंदन करुन शांततेचा भाव मनात जागृत करुनच लोक शहरात येतील. अशी शांतता प्रस्थापित करणे हे विकासासाठी अत्यंत आवश्यक असते,असे प्रतिपादनही पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

भदंत बोधीपालो महाथेरो व भिक्खु संघाच्या वतीने प्रतिष्ठापना, पूजन आणि धम्मदेसना करण्यात आली तसेच भिक्खुंना मान्यवरांच्या हस्ते चिवरदान करण्यात आले. बुद्धिस्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरस अँड ट्रेडर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष मिलिंद थोरात, सुभाष मुदगावकर, प्रवीण कुमार वसाते, सिद्धार्थ जाधव, बाळासाहेब पठारे, सूर्यकांत कोटकर, रामचंद्र पठारे, सुभाष मोरे विनोद अवसरमल, प्रमोद राऊत, संदीप केदारे आदी यावेळी उपस्थित होते. मिलिंद बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### अशी आहे बुद्धमूर्ती!

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा-वेरूळ लेण्यांमधून बौद्ध संस्कृतीचे दर्शन होते. जगभरातून येथे येणाऱ्या पर्यटकांना शहराच्या ऐतिहासिक वारशाची जाणीव व्हावी, यासाठी विमानतळावर भव्य बुद्धमुर्ती उभारण्याची कल्पना पुढे आली. 'भिमता' संघटनेच्या सदस्यांनी हा प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाकडे सादर केला. ११ जानेवारी २०२३ रोजी या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. तेलंगणातील आलागट्टा येथे १५.५ फूट उंच आणि अखंड बेंगलोरी ग्रॅनाइटमध्ये अभयमुद्रा असलेली बुद्धमूर्ती तयार करण्यात आली. ही बुद्धमूर्ती ५ मे २०२३ रोजी बौद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी स्थानापन्न करण्यात आली होती. त्यानंतर संपूर्ण परिसराचे सुशोभिकरण करून आज लोकार्पण करण्यात आले.



# जिंदाल स्टेनलेस महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटींची गुंतवणूक करणार

## उद्योजक रतन जिंदाल यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जिंदाल स्टेनलेस लिमिटेड महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प उभा करणार आहे. यातून सुमारे साडे पंधरा हजार रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याने, या प्रकल्पाचे महाराष्ट्रात स्वागत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जिंदाल स्टेनलेस लिमिटेडचे अध्यक्ष रतन जिंदाल यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची 'सागर' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत श्री. जिंदाल यांनी या प्रकल्पाच्या उभारणीचा प्रस्ताव सादर केला. या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वार्षिक चार दशलक्ष टन इतकी असणार आहे.

या उद्योग समुहाने आणि श्री. जिंदाल यांनी महाराष्ट्राच्या क्षमतेवर दाखविलेला विश्वास महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पाकरिता सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत नमूद केले. याप्रसंगी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, जिंदाल समुहाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.



# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना; कन्नड तालुक्यात ६० लाभार्थ्यांना ९१ हे.जमिनीचे वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत कन्नड तालुक्यातील ६० लाभार्थ्यांना सोडत पद्धतीने एकुण ९१ हे ०१ आर (२१२ एकर २६ गुंठे) जमीन वाटप करण्यात आली.

कन्नड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील दालनात उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसिलदार प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी संदीप सिरसाठ, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक श्रीमती सीमा सिंदीकर यांच्या उपस्थितीत नीदा नवीद खान वय ५ वर्ष या मुलीच्या हस्ते सोडत काढण्यात आली.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजनेअंतर्गत मागासवर्गीय संवर्गातील भुमिहिन शेतमजूरांना ही जमिन शेतीसाठी १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्रेषेखालील भुमिहिन कुटूंब सन २०२१-२०२२ पासुन लाभ मिळण्याच्या प्रतिक्षेत होते. त्यासाठी समाज कल्याण विभागाने सन २०२२-२३, २०२३-२४ व चालु वर्षात जमीन खरेदी करुन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. याकामी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी पुढाकार घेतला. त्यासाठी आज कन्नड उपविभागीय कार्यालयात सोडत पद्धतीने चिठ्या काढुन मौ.माळेगांव लोखंडी, माळेगांव ठोकळ, वासडी, पळशी बु, नादरपुर व गौरपिंपरी या ठिकाणच्या जमीनी प्रति लाभार्थी चार एकर (कोरडवाहु) प्रमाणे निवड करण्यात आली. या ६० लाभार्थ्यांच्या जमिन मालकीच्या आदेशासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हास्तरीय समितीकडे अंतीम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये या लाभार्थ्यांना सातबारा उतारा मिळेल.

महसुल सहाय्यक जीवन चव्हाण, समन्वयक अभिजित पानट, मंडळ अधिकारी विकास वाघ, तलाठी संगीता सुर्यवंशी, तलाठी एस. ए. बावस्कर, शिरस्तेदार आनंद शिंदे, तलाठी एस.डी.विसपुते, ग्राम विकास अधिकारी के एस थोरात, ग्रामसेवक एस. एस. गोसावी आदींनी परिश्रम घेतले यावेळी लाभार्थी उपस्थित होते.

# मध्यवर्ती कारागृहात 'जीवन गाणे गातच जावे'



छत्रपती संभाजीनगर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, पुणे यांच्या मार्गदर्शानाखाली विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग, यांच्या सहकार्याने कारागृहातील बंद्यांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत व्हावे व त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा ते कारागृहात मुक्त झाल्यावर समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे या करीता मंगळवार दि.२५ 'जीवन गाणे गातच जावे' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध लोककला, भारुड, देशभक्तीपर गीत, नृत्य या सारख्या विविध कलांचा समावेश होता. या आयोजनात अधीक्षक मध्यवर्ती कारागृह दत्तात्रय गावडे, वरिष्ठ तुरंगाधिकारी प्रदीप रणदिवे तसेच कार्यक्रमाचे समन्वयक अनिल घोगरे तसेच त्यांचा म्युझिकल ग्रुप आणि मोठ्या संख्येने बंदीजन अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले.

# वीजबिल भरूनच नवरदेव चढला बोहल्यावर!

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-मार्च महिन्याच्या अखेरीस महावितरणने वीजबिल वसुलीची मोहीम हाती घेतली आहे. यात थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाईही कर्मचाऱ्यांना करावी लागते. मात्र सोयगाव तालुक्यातील एका नवरदेवाने आपल्या घराचे चालू वीजबिल भरल्यानंतरच सप्तपदी घेतली. संसाराला सुरुवात करण्यापूर्वी बिल भरून आदर्श वीजग्राहक बनण्याचा पायंडा या तरुणाने घालून दिला आहे. या तरुणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्याचे झाले असे की, सोयगाव तालुक्यातील कंकराळा गावातील अजय सोनाजी पाटील या तरुणाचे जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यातील खडकदेवळा गावातील तरुणीशी २५ मार्च २०२५ रोजी कंकराळा येथेच लग्न झाले. तत्पूर्वी सकाळी तो हळदीसाठी विवाहस्थळी जात होता. नेमके त्याचवेळी महावितरणच्या सोयगाव शाखेचे विद्युत सहायक ज्ञानेश्वर सूर्यवंशी व त्यांचे सहकारी वीजबिल वसुली मोहिमेसाठी कंकराळा येथे आलेले होते. सूर्यवंशी यांना पाहताच नवरदेव अजयने आमच्याकडेही काही वीजबिल बाकी आहे का, अशी विचारणा केली. त्यावर सूर्यवंशी यांनी थकबाकी नाही, पण १३४० रुपयांचे चालू वीजबिल असल्याची माहिती दिली. खरं तर वीजबिल भरण्यास मुदत होती. परंतु नवरदेव अजयने क्षणाचाही विलंब न लावता १३४० रुपयांची रक्कम महावितरणचे कर्मचारी सूर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द करून बिल भरण्यास सांगितले. नवरदेवाच्या या तत्परतेमुळे महावितरण कर्मचाऱ्यांनाही सुखद धक्का बसला. लग्नासारख्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगीही कर्तव्याचे भान अजय पाटील यांनी ठेवले.



यावेळी नवरदेव अजय पाटील म्हणाले की, 'जी सेवा आपण रोज वापरतो, तिचे देयक भरलेच पाहिजे. मी आमच्या घराचे वीजबिल कधीच थकीत ठेवत नाही. नेहमीच वेळेवर बिल भरतो. आजही माझ्या लग्नाच्या दिवशी महावितरणचे कर्मचारी भेटले आणि मीही लगेच बिलाची रक्कम त्यांच्याकडे देऊन टाकली. महावितरणचे कर्मचारी नेहमीच आमच्या भागात ऊन, वारा, वादळ, पाऊस या कशाचीच तमा न बाळगता उत्तम सेवा देतात. मग मीही माझे कर्तव्य बजावले. इतर वीजग्राहकांनीही आपले वीजबिल वेळेवर भरून महावितरणला सहकार्य करावे.' नवरदेव अजय पाटील यांच्या कर्तव्यतत्परतेचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनीही कौतुक केले असून, त्यांच्या वैवाहिक जीवनास शुभेच्छा दिल्या आहेत.

# ६८१६ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित, थकबाकीदारांवर महावितरणची कारवाई

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- वीजबिल थकबाकीचा भरणा होत नसल्याने महावितरणकडून सर्व वर्गवारीतील थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. चालू महिन्यात जालना जिल्ह्यातील ६ हजार ८१६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा महावितरणकडून खंडित करण्यात आला आहे.

थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे सर्व अभियंता, अधिकारी, कर्मचारी सध्या ऑन फिल्ड आहेत. एका महिन्याचे वीजबिल थकीत असले तरी बिलाची रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. त्यामुळे थकबाकी तसेच चालू वीजबिलांचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

यासोबतच थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची विभाग, मंडल व परिमंडल कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वतंत्र पथकांद्वारे पडताळणी सुरू आहे. थकबाकीदार हा शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून वायर किंवा केबलद्वारे विजेचा वापर करीत असल्याचे आढळल्यास दोहोंविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. सोमवारी (२४ मार्च) महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी जालना शहर व बदनापूर येथे ठिकठिकाणी भेट देऊन थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांची पडताळणी केली. यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांनी थकबाकी वसुली मोहिमेबाबत सूचना केल्या. थकीत व चालू वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे यासाठी या महिन्यात सुटीच्या दिवशीही महावितरणचे अधिकृत वीजबिल भरणा केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहे. यासह घरबसल्या वीजबिल भरण्यासाठी लघुदाब वर्गवारीतील सर्व वीजग्राहकांना



mahadiscom.in ही वेबसाइट व मोबाईल अॅपद्वारे ऑनलाइन सोय उपलब्ध आहे.

जालना जिल्ह्यातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील १ लाख ९ हजार २६१ ग्राहकांकडे १०३ कोटी २९ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी आहे. थकबाकी न भरणाऱ्या ६ हजार ८१६ जणांचा वीजपुरवठा खंडित आला आहे.

# गो. से. महाविद्यालयात चिमणी दिवस साजरा, दोन दिवशीय कार्यशाळेत ७२ विद्यार्थी सहभागी

खामगाव दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- स्थानिक गो. से. महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाद्वारे जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून ''नेस्ट फ्रॉम वेस्ट' आणि ''एक मूठ धान्य पक्ष्यांसाठी' या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. पी. व्ही. उबाळे अध्यक्षस्थानी होते. डॉ. ए. व्ही. पडघन, डॉ. एन. बी. कुटेमाटे, डॉ. जी. बी. काळे, प्रा. सुहास पिढेकर, प्रा. मनोज बाभळे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील बी.एससी. भाग १, २ व ३ चे सुमारे ७२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे यांनी केले. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक पडघन, उप-प्राचार्य डॉ. पी. व्ही. उबाळे यांनी मार्गदर्शन केले. विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुभाष बोबडे तसेच मंडळाचे सचिव डॉ. प्रशांत बोबडे यांनी कार्यशाळेला भेट देऊन विद्यार्थी तसेच शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. सुहास पिढेकर, प्रा. मनोज बाभळे, डॉ. दिपाली धरमकर, प्रा. सचिन खंडारे, प्रा. अनिकेत वानखेडे, प्रा. ज्योति शर्मा, प्रा. तृप्ती पारसकर व विद्यार्थ्यांमध्ये हर्षल पांढरे, राहुल मानकर, शिवम खराटे, अभिषेक इंगळे, गौरव सूर्यवंशी, पल्लवी तायडे, नेहा हिवराळे, प्रिया चव्हाण, गौरी राजपूत, प्रगती धोटे, साक्षी इंगळे, अनुजा बनकर, स्वाती धुळे, स्नेहल तळपते आदींनी परिश्रम घेतले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# जागतिक ग्राहक हक्क दिन उत्साहात साजरा

## ग्राहकांनी वस्तु, सेवेची खरेदी करतांना जागरुकता बाळगावी-अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सुरक्षीत वस्तु खरेदी हा ग्राहकाचा हक्क आहे. ग्राहकाने खरेदी करतांना उत्पादनाशी निगडीत उत्पादनाची गुणवत्ता, प्रमाण, मुल्य, शुध्दता आणि वापरावयाची अंतिम तारीख तपासणे महत्वाचे आहे. या जगात मोफत काहीच मिळत नसते त्यामुळे अनोळखी क्रमांकाच्या कॉलवरुन येणाऱ्या अमिषाला बळी पडू नये. तरी ग्राहकांनी वस्तु, सेवेची खरेदी करते वेळी जागरुकता बाळगणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी केले.

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त ग्राहक जनजागृतीपर कार्यक्रम जालना येथील मस्त्योदरी शिक्षण संस्थेच्या अंकुशराव टोपे महाविद्यालयातील सभागृहात पार पडला. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, तहसीलदार छाया पवार, सायबर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जी.एस.शिंदे, यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.

अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार म्हणाल्या की, ग्राहकाची फसवणूक झाल्यास उत्पादन, व्यावसायिक किंवा कंपनी यांच्याविषयीची तक्रार ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत करता येवू शकते. ग्राहकाला कोणत्याही कंपनीच्या उत्पादनाची निवड करण्याचा हक्क आहे. कोणत्याही फसव्या जाहिराती, अनोळखी कॉल्सना बळी पडू नका असेही त्यांनी सांगितले.

सायबर पोलिस निरीक्षक श्री. शिंदे म्हणाले की, पुर्वी सायबर गुन्ह्यात आर्थिक फसवणूक करण्यात येत होती. तरुणांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा पोस्ट समाज माध्यमांवर पोस्ट करु नये. आता नवीन प्रकारात समाज माध्यमांचा वापर करुन फेक आयडी तयार करत बदनामीकारक मजकुरासह फोटो टाकून बदनामी करण्यात येत आहे. व्हॉटसअप हॅक करुन आपल्या जवळच्या व्यक्तीकडून पैशाची मागणी करण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. यामध्ये एपीके फाईल्सचा शिरकाव झाला आहे. एपीके फाईल्स आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करु नये, त्यामुळे आपला मोबाईल ॲक्सेस सायबर क्रिमीनलकडे जावून तो हवा तसा आपला महत्वाचा डेटा वापरुन फसवणूक करु शकतो. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन तरुण-तरुणींची थेट व्हॉटसअप व मोबाईलमधील आवश्यक सुरक्षा सेटींग जागेवर करुन घेतली.

कार्यक्रमात पवन सांगळे विद्यार्थ्याने सायबर क्राईम विषयक निर्भिडपणे प्रश्न विचारत आपल्या मनात असलेल्या शंकेचे समाधान करुन घेतले. तसेच केवळ मनोरंजन म्हणून नव्हे तर शिक्षण विषयक युट्युब चॅनेलचा अभ्यासासाठी खुप फायदा होतो असे सांगून कार्यक्रमाचे कौतुक करत या प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम प्रत्येक महाविद्यालयात नियमितपणे घेणे गरजेचे असल्याची भावनाही त्याने व्यक्त केली.

कार्यक्रमात नारायण काळे आणि श्रीमती विद्या वाहुंळे या स्वस्त धान्य दुकानदारांनी त्यांच्याकडील शिधापत्रिका धारकांची १०० टक्के ई-केवायसी पुर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी सांगितले की, पुर्वीच्या काळात वस्तुविनिमय पध्दती अस्तित्वात होती. एका वस्तुच्या बदल्यात दुसरी हवी असणारी वस्तु ग्राहकाला मिळत होती. कालांतराने चलन पध्दतीचा उदय झाला आणि विक्रेत्यांची ग्राहकांशी बांधिलकी राहिली नाही, त्यामुळे फसवणुकीच्या घटना घडण्यास सुरुवात झाली. ग्राहकांच्या संरक्षणासाठी भारतात १९८६ ला पहिला ग्राहक संरक्षण कायदा तयार झाला तर त्यामध्ये बदल करुन २०१९ ला नवा कायदा तयार करण्यात आला. याप्रमाणे जागतिक ग्राहक हक्क दिनाची पार्श्वभूमी सांगून कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विषद केली. या कार्यक्रमास नागरिक तसेच महाविद्यालयीन युवक-युवतींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



# परतूरला शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पक्ष्यांसाठी केली दाणा-पाण्याची सोय

परतूर दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- कडाक्याच्या उन्हात पक्ष्यांना प्यायला पाणी तसेच खायला अन्न मिळावे, पक्ष्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने शहरातील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शाळेतच पक्ष्यांना लागणाऱ्या दाणा-पाण्याची सोय केली.

सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. कडाक्याचे ऊन पडत आहे. उन्हामुळे अंगाची लाही-लाही होत आहे.उन्हाच्या तीव्रतेने शेत-शिवारे, बरड माळराने सुकली आहेत.पानवठ्यांची पाणीपातळी खालावली आहे. पक्ष्यांना पिण्याचे पाणी मिळेनासे झाले आहे.

निसर्गाचे संतुलन अबाधित राहण्यासाठी पक्षी मोलाची भूमिका बजावत असतात. अशा या पक्ष्यांना उन्हाळ्यात प्यायला पाणी मिळावे तसेच खायला अन्न मिळावे या उद्देशाने शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या मार्गदर्शनात पक्ष्यासाठी दाणा-पाण्याची सोय केली.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-नवोदय विद्यालय समितीद्वारे इयत्ता सहावीसाठी घेण्यात आलेल्या निवड चाचणी परीक्षा -२०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील पीएम श्री नवोदय विद्यालयासाठी एकुण ८० विद्यार्थ्यांची निवड यादी प्राप्त झाली असून विद्यालयाच्या सुचना फलकावर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तरी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे तात्काळ सादर करावी, असे आवाहन प्राचार्य एस. जी. पवार यांनी केले आहे.

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या ८० जागेसाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या निकालात जालना जिल्ह्यातील विविध तालुक्यामधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. तालुकानिहाय निकालानुसार पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये जालना ११, भोकरदन १०, जाफराबाद ८, परतूर १२, अंबड ११, बदनापूर ६, घनसावंगी १४, मंठा ८ असे एकुण ८० विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार आणि शिक्षकांसह पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक होत आहे. नवोदय विद्यालय समितीद्वारे इयत्ता नववीमध्ये रिक्त असलेल्या ४ जागेसाठी घेण्यात आलेल्या निवड चाचणी परीक्षेचा निकालही जाहीर केला असून नवोदय विद्यालयासाठी एकुण चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. परीक्षेला जालना जिल्ह्यातून इयत्ता आठवीचे एकूण ४४६ विद्यार्थी बसले होते. ही निवड यादी नवोदय विद्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या असेही कळविले आहे.

# पोलीस ठाणे सदर बाजार डिबी पथकाकडून प्रतिबंधीत गुटखा व वाहन असा एकुण ९,५०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पोलीस ठाणे सदर बाजार डिबी पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के यांना गोपनिय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, संभाजीनगर परीसरामध्ये महिंद्रा कंपनीची जीतो प्लस लोडींग गाडी उभी आहे. अशी खात्री लायक बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची माहिती प्रभारी अधिकारी संदीप भारती यांना देऊन त्यांचे आदेशाने तसेच मार्गदर्शनाखाली, दोन पंच व पोलीस स्टाफ सह संभाजीनगर परीसर जालना येथे जाऊन सदर गाडीचा शोध घेतला असता तेथे एक गाडी एम एच -२०-बीएच-७४०० महिंद्रा कंपनीची जितो प्लस लोडींग गाडी मिळुन आली



आसता आम्ही आजुबाजुला गाडीच्या मालकाबाबत विचारपुस केली गाडी मालक अजय वाघमारे रा ढवळेश्वर जालना यांचे नावावर असल्याचे आढळून आले त्यांचे मोबाईलवर फोन केला असता तो मोबाईल बंद असल्याचे आढळुन आले सदर गाडी पोस्टेला आणुन अन्न व औषध प्रशासन यांना लेखी पत्रक दिले. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी आज दिनांक २८/०३/२०२५ रोजी १४.३० वाजता दोन पंचासमक्ष सदरील वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २,००,०००/- रुपये किंमतीचा ज्यामध्ये २० गोण्या प्रत्येक गोणीत Export Quality No 1 असे लेबल असलेले ५० पाकीट याप्रमाणे एकुन १००० पाकीट त्यामध्ये सुपारी कथा, चुना व तंबाखु मिश्रीत गुटखा व ७,५०,०००/- रुपये किंमतीची महिंद्रा जितो प्लस लोडीग गाडी वाहन क्रमांक एम एच-२०-बीएच-७४०० असलेली असा एकुन ९,५०,०००/- रुपयाचा मुददेमाल मिळुन आलेले आहे. १. अजय वाघमारे रा. ढवळेश्वर, जालना २. सचिन तारगे रा. संभाजीनगर, जालना यांचेवर कलम १२३,२२३,२७५,३ (५) भारतीय न्यास संहिता २०२३ सह कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अजयकूमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयूष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे अतिरीक्त पदभार, पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि शैलेश म्हस्के यांचे नेतृत्वात डी.बी. पथकाचे पोहेकॉ रामप्रसादर रंगे, पोहेकॉ धनाजी कावळे, पोकॉ धनंजय लोढे यांनी केली आहे.

# उद्या दु:खी व ना.धों.महानोर पुरस्काराचे वितरण

## कवितेचा पाडवा: काव्यमैफल,चित्रप्रदर्शन त्रिवेणी संगम

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गुढीपाडव्यास प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही साहित्याची गुढी उभारली जाणार असून रविवारी ( ता.३०) सायंकाळी ७.०० वा. जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात ''दु:खी'' राज्य काव्य आणि ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्काराचे वितरण, प्रसिद्ध चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन व नामवंत कवींची काव्यमैफल अशा त्रिवेणी संगमाची पर्वणी रसिकांना अनुभवता येणार आहे.

सुप्रसिद्ध उर्दू शायर राय हरिश्चंद्र साहनी ऊर्फ दु:खी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मराठी कवितेतील समग्र योगदानासाठी ''दु:खी'' राज्य काव्य पुरस्कार मागील २७ वर्षांपासून वितरित केला जातो.आतापर्यंत मराठी साहित्य विश्वातील अनेक दिग्गजांना सदर पुरस्काराने गौरविण्यात आले असून अनेक प्रख्यात कवींनी कवितेच्या पाडव्यात हजेरी लावत आपल्या कवितांचे सादरीकरण केलेले आहे. भरगच्च रसिकांचा प्रतिसाद हे वेगळे वैशिष्ट्य असलेल्या देखण्या सोहळ्याचे हे २७ वे वर्ष असून संयोजकांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही वेगळे स्वरूप देत कवितेच्या पाडव्या ची अभिनव रचना केली आहे.

लासलगाव येथील शेतकरी असलेले कवी -गीतकार प्रकाश होळकर यांना '' दु:खी '' राज्य काव्य पुरस्कार रोख पंचवीस हजार रूपये तर कोल्हापूर येथील ज्येष्ठ लेखक रफीक सूरज यांना ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कार रोख दहा हजार रूपये , शाल व सन्मानचिन्ह स्वरूपात प्रसिद्ध साहित्यिक महावीर जोंधळे (पुणे) यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण केले जाईल. उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ हे उपस्थित राहणार आहेत. पुरस्कार वितरणानंतर रफीक सूरज, प्रकाश होळकर, लता ऐवळे(सांगली), सुनील उबाळे (छ. संभाजीनगर) या निमंत्रित कवींची काव्यमैफल रंगणार असून रवींद्र मगर (छ.संभाजीनगर) हे निवेदन करतील. कार्यक्रम स्थळी प्रसिद्ध चित्रकार स्वप्निल रगडे (बीड) ,सागर जैन व सुशील करनाडे (जालना) यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरवले जाणार आहे.

रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कै. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्टचे विनीत साहनी, अभय साहनी, अनुभव प्रतिष्ठान च्या डॉ. संजीवनी तडेगावकर, पंडितराव तडेगावकर यांनी केले आहे.

# मुळ दस्त हरविल्याबद्दल फायनान्स कंपनीला दंड-अँड.धन्नावत

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- होम फर्स्ट फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्याकडुन पुष्पा राजु बुरला व राजु रामलु बुरला यांनी रक्कम रु. २०,००,०००/- गृहकर्ज दि. २१-१२-२०२१ रोजीच्या मंजुरी पत्रान्वये घेतले होते व त्यासाठी त्यांनी त्यांच्या घराची मुळ खरेदी खत हे कंपनीकडे तारण दिले होते. पुष्पा राजु बुरला व राजु रामलु बुरला यांना सदर कंर्ज इतर फायनान्स कंपनीकडे वर्ग करावयाचे होते, कारण होम फर्स्ट फायनान्स कंपनी लिमिटेडचे व्याज दर जास्त होते. मात्र फायनान्स कंपनीने मुळ दस्त दिले नाही कारण ते हरवले होते तथा कर्जदाराच्या संमत्तीशिवाय होम फर्स्ट फायनान्स कंपनी लिमिटेडने अग्रेजी वृत्तपत्रात प्रगटन सुध्दा प्रसिध्द केले होते की, दस्त हरवले आहे. त्यामुळे बुरला दांम्पत्यांनी अँड. महेश धन्नावत मार्फत ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती व अँड. धन्नावत यांचे युक्तीवाद गृहित धरुन मा. आयोगाने होम फर्स्ट फायनान्स कंपनी लिमिटेड यांना मुळ दस्ताची प्रमाणित प्रत व प्रमाणपत्र की मुळ दस्त हरवले आहे द्यावे तथा नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये ४,४८,०००/- व तक्रारीचा खर्च रुपये १०,०००/- सुध्दा द्यावें, नसता त्यावर ९% व्याज सुध्दा द्यावे असे आदेश दिला. या आदेशावर आयोगाच्या अध्यक्षा अर्पणा हेमंत काटे, सदस्य संतोष निकुले व उदय दळवी यांची स्वाक्षरी आहे. या आदेशाने फायनान्स कंपनीच्या निष्काळजीपणावर आळा बसेल अशी अपेक्षा अँड. धन्नावत यांनी व्यक्त केली.

# बुऱ्हाणनगर येथील तुळजाभवानी मंदिराची मालमत्ता बळकविण्याचे षडयंत्र

## जालना तेली समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जालना दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- अहिल्यानगर जिल्ह्यातील बुऱ्हाणनगर येथे तेली समाज बांधवांचे पुरातन असे तुळजाभवानी मंदिर आहे. मात्र स्थानिक आमदाराचा सदर मंदिर व मंदिराच्या मालमत्तेवर डोळा असून ही सर्व मालमत्ता बळकविण्याचे षडयंत्र असून हा प्रकार तात्काळ थांबवावा तसेच तेली समाजाची असलेली श्रध्दा व अस्मिता यांचे रक्षण करावे, अशी मागणी जालना शहरातील तेली समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना शुक्रवारी निवेदनाद्वारे करण्यात आली. विशेष म्हणजे मंदिराचे सुमारे ११०० वर्षांपासून तेली समाजाकडे नियोजन आहे. तेली समाजाकडून योग्यरित्या मंदिराची पूजा-अर्चा व देखभाल दुरूस्ती केली जाते. मात्र स्थानिक आमदार शिवाजी कर्डीले हे जाणिवपूर्वक बाधा आणत असून परंपरा खंडित करत आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, आई जगदंबा तुळजाभवानीने लहान मुलीच्या रूपात १२ वर्ष बुऱ्हाणनगर याठिकाणी आमचे पूर्वज संत जानकोजी भगत (तेली) यांच्या घरी वास्तव्य केलेले आहे. संत जनकोजी तेली यांना तुळजाभवानीने साक्षात्कार देऊन वरदान दिले तेव्हापासून सुमारे ११०० वर्षापासून तेली समाजाच्या भगत घराण्याकडे असलेली तुळजाभवानी पालखी परंपरा अखंडपणे चालू आहे. भगत घराण्यातून श्री क्षेत्र तुळजापूर, धाराशिव येथे शारदीय नवरात्रीमध्ये प्रत्येक वर्षी गेल्या ११०० वर्षापासून अधिक काळापासून पालखी जाते आणि श्री तुळजाभवानीची देवीची मूळ मूर्ती पालखी मधून बसवून सीमोलंघन केले जाते आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विजयादशमी/ दसरा सण मोठ्या उत्सवात साजरा केला जातो.

सदर परंपरेतून आणि भक्तीमधून कै. लहानू भिकू भगत (तेली ) यांनी स्वतःच्या जमीनी विकून १९१३ साली घरातील देवघराला मंदिराचे स्वरूप दिले. सदर मंदिर देव्हारा महाराष्ट्रात प्रसिद्ध असून सर्व तुळजाभवानी भक्त आणि संपूर्ण तेली समाजाची आस्था याठिकाणी असून महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवनीचे माहेर अशी ओळख म्हणून नावारूपास आलेले हे मंदिर देव्हारा ऐतिहासिक महत्व असलेले आहे.

यामुळे आकसापोटी व जातीय द्वेषातून गावातील लोकप्रतिनिधी तथा आमदार शिवाजी कर्डीले हे तुळजाभवानीचे मंदिर आणि स्थावर मिळकत बळकविण्याच्या गैरहेतून प्रेरित होऊन गेल्या अनेक वर्षापासून पुजारी भगत

कुटुंबीयास वेगवेगळ्या मार्गाने सत्तेचा, प्रशासनाचा, पदाचा व गुंडगिरीचा वापर करुन पुजारी भगत कुटुंबीयावर खोट्या केसेस करणे, घरावर चालून जाणे, शिवीगाळ करणे, हातपाय तोडणे, मारून टाकण्याची दमदाटी करणे, मंदिराविरुद्ध सत्तेचा गैरवापर करुन चुकीचे आणि लबाडीचे आदेश पारीत करून घेणे, बदनामी करणे, मंदीर व परिसराच्या विकासाच्या विरोधात कारस्थाने करणे, इतर मिळकतींमध्ये त्रास देणे इ. अनेक प्रकारे गुन्हेगार इसमांना उभे करून मंदिरास व विविध विकासास त्रास देत आहे याबाबत अनेक तक्रारी पोलीस, महसूल, विधी व न्याय आणि इतर संबंधित शासकीय विभागास वेळोवेळी देवून देखील कुठलीही कारवाई होत नाही. राजकीय पदाचा व सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून नुकतेच दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी स्थानिक प्रशासनास हाताशी धरून अधिकृत कायदेशीर बांधकाम असतानाही अनधिकृत बांधकाम असल्याचा बागलबुवा करून मंदीराच्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी स्वतः च्या मालकीच्या जागेत उभारण्यात आलेले सांस्कृतिक भवन उद्ध्वस्त केले. इतक्यावरच न थांबता श्री देवी मंदिराचे प्रवेशद्वारही पाडले. देवीची पालखी व पूजा सामग्री इ.यांची तोडफोड करून विटंबना केली त्यामुळे आमच्या धार्मिक भावना



दुखावल्या गेल्या असून त्यामुळे श्री देवीचे पुजारी भगत कुटुंबीय अत्यंत भयभीत होवून त्रासलेले आहोत. याबाबत योग्य त्या तक्रारी देखील दिलेल्या आहेत. परंतु राजकीय वरदहस्तामुळे कुठलीही कडक कारवाई केली जात नाही. सदर निवेदनानुसार संबंधित लोकांवर कारवाई लवकरात लवकर केली नाही तर राज्यभर आंदोलने करण्यात येतील याची देखील नोंद घ्यावी. निवेदनावर कादराबाद तेली समाज पंच कमिटी जालनाचे अध्यक्ष विनोद शिनगारे, उपाध्यक्ष नारायण मिटकर, उपाध्यक्ष पंकज शेंदरकर, सचिव मनोज गडगिळे, कोषाध्यक्ष आनंद वाघमारे, सहकोषाध्यक्ष सागर राऊत, अशोक पांगारकर, राजेंद्र वाघमारे, रमेश गाडे, मोहन अबोले, ज्ञानेश्वर सोनुने, अनिल वाघमारे, विजय शेंदरकर, श्रीनिवास पांगरकर, संजय राऊत, श्रीकांत पांगारकर, आनंद राऊत आदींच्या सह्या आहेत.संजय शिंगारे, अरुण गाडे, अनिल व्यवहारे, रामेश्वर गडगिळे, वासुदेव देवडे, आनंद राऊत, अनिल मिसाळ, प्रमोद वाघमारे, प्रमोद मालोदे, कैलास सोनवणे, शिवम शिंगारे, संजय कातकडे, गणेश सिंगारे, सचिन पारख, ॲड परमेश्वर गडगिळे, राजेश मिसाळ, ज्ञानेश्वर सोनवणे, गिरीराज राऊत, संजय करवंदे, विश्वनाथ शिरसागर, प्रकाश राऊत, छायाचित्रकार गौतम वाघमारे मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# डेटा सेंटर, स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रात महाराष्ट्र देशात अव्वल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून डेटा सेंटर, स्टार्टअप, इनोव्हेशन व गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करत आहे. तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, फिनटेक या क्षेत्रातील गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे आवडते गुंतवणुकीचे ठिकाण झाले आहे. नवी मुंबई परिसरात इनोव्हेशन सिटी उभारण्यात येत असून वसई, विरार, पालघर परिसरात चौथी मुंबई निर्माण होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुंबईतील हॉटेल ताजपॅलेस येथे आयोजित यु.एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी) च्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी यूएसआयबीसीचे अध्यक्ष राजदूत अतुल केशप, यूएस कन्सुल जनरल माइक हंकी, यूएस चेंबरच्या अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुझेन क्लार्क आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अमेरिका व भारतातील उद्योग वाढीमध्ये यु. एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी)चे मोठे योगदान आहे. दोन्ही देशातील उद्योगांमधील सहकार्यासाठी अर्थपूर्ण व औपचारिक भूमिका कौन्सिल पार पाडत आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचे गुंतवणुकीचे स्थान आहे. भारतातील अनेक उद्योजक अमेरिकेत गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत, तसेच अमेरिकेतीलही अनेक गुंतवणूकदार भारतात येण्यास उत्सुक आहेत.

देशातील सर्वाधिक गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र हा अव्वल स्थानावर असून देशाच्या सकल उत्पन्नात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. थेट परदेशी गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राने स्वतः चाच विक्रम मोडला असून परदेशी गुंतवणूकदारांचे हे आवडते ठिकाण झाले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र हे स्टार्टअपची राजधानी म्हणून ओळखले जात आहे. स्टार्टअपमधील गुंतवणूक व स्टार्टअप कंपन्यांमध्येही महाराष्ट्र अव्वल असल्याचे एका अहवालात नमूद केले असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आर्थिक, व्यापार, नाविन्यता यामधील गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र हे उद्योग जगताचे आवडते ठिकाण झाले आहे. अटल सेतू व नवी मुंबई विमानतळामुळे त्या परिसराचा कायापालट होत असून नवी मुंबईत विशिष्ट संकल्पनेवर आधारित नाविन्यता शहरे उभारण्यात येत आहेत. नाविन्यता, शिक्षणाशी संबंधित इकोसिस्टीम तयार करण्यात येत आहे. या परिसरात परदेशातील जागतिक क्रमवारीतील पहिल्या पन्नासमधील ५ विद्यापीठे येणार असून त्यातील तीन विद्यापीठे ही अमेरिकेतील आहेत. त्यामुळे नवी मुंबई हे एक एज्युसिटी म्हणून ओळखले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात डेटा सेंटरमध्ये गुंतवणूक होत आहे. देशातील ६५ टक्के डेटा सेंटर येथे आहेत. त्यामुळे राज्याला आता डेटा सेंटरचे कॅपिटल म्हणूनही ओळखले जात आहे. या डेटा सेंटरला पुढील २०२३ पर्यंत हरित ऊर्जा पुरविण्यात येणार आहे. पालघरजवळ देशातील सर्वात मोठे वाढवण बंदर उभारण्यात येत आहे. जेएनपीटीपेक्षाही तीन पट मोठे हे बंदर असून या बंदराला बुलेट ट्रेन, मल्टिमॉडेल कॉरिडॉरने जोडले जाणार आहे. तसेच महामुंबईतील तिसरे विमानतळही उभारण्यात येत आहे. पायाभूत सुविधा व गुंतवणुकीमुळे हा परिसर चौथी मुंबई म्हणून विकसित होत आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पूर्वी माओवाद्यांचा जिल्हा म्हणून ओळख असलेला गडचिरोली जिल्हा आता देशाचे स्टिल हब म्हणून ओळखला जाणार आहे. या परिसरात स्टिल उद्योगामध्ये सुमारे दोन लाख कोटींची गुंतवणूक होत आहे. पुणे हे उत्पादन उद्योगांचे शहर आहेच. त्याचबरोबर आता छत्रपती संभाजीनगरमधील दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरमुळे हा परिसर ईलेक्ट्रिक वाहनांची राजधानी बनला आहे. त्यासाठीची संपूर्ण व्यवस्था या परिसरात तयार केली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.




जागतिक मनोरंजन परिषदेचे (ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट-वेव्ज २०२५) आयोजन करण्याचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे. ही परिषद यंदा मुंबईत होणार असून या परिषदेसाठी अमेरिकेतील उद्योजक, गुंतवणूकदारांनी सहभागी व्हावे, असे निमंत्रण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

जगाला भारताच्या मनोरंजन विश्वातील कला, सृजनशीलता आणि प्रतिभा दाखविण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी यूएसआयबीसीचे अध्यक्ष राजदूत अतुल केशप, यूएस कन्सुल जनरल माइक हंकी, यूएस चेंबरच्या अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुझेन क्लार्क यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे स्वागत केले.



# उन्हाळी हंगामात अखंडित सिंचनासाठी अतिरिक्त रोहित्रे तयार ठेवावीत-जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामात अखंडित सिंचन सुविधा मिळावी यासाठी वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर द्यावा. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात आणि संभाव्य तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन अतिरिक्त रोहित्रे तयार ठेवावीत, असे निर्देश जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले. विधानभवनात सन २०२४-२०२५ उन्हाळी हंगामासाठी सांगली पाटबंधारे कालवा सल्लागार समितीची बैठक. (टेंभू उ.सिं.यो., कृष्णा कोयना सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ, आरफळ कालवा व कृष्णा कालवा.) व धोम-कण्हेर, उरमोडी व तारळी प्रकल्पांचे सन २०२४-२०२५ उन्हाळी हंगामासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक झाली. त्यावेळी जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, आमदार सुरेश खाडे, गोपीचंद पडळकर,विश्वजित कदम, रोहित पाटील, सुहास बाबर, सदाभाऊ खोत, अरुण लाड, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले व जलसंपदा व ऊर्जा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, उपसा सिंचन योजना सुरळीत ठेवण्यासाठी कंत्राटी एजन्सी नेमण्यात याव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांना सुलभ पद्धतीने सिंचन आवर्तन देता येईल. तसेच उन्हाळी हंगामासाठी प्रकल्पनिहाय सिंचनासाठी पाणीवापर व सिंचन आवर्तनाचे नियोजन करावे, असेनिर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी सांगली पाटबंधारे अंतर्गत टेंभू, ताकारी ,म्हैसाळ व आरफळ व सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ येथील धोम, उरमोडी, कण्हेर व तारळी प्रकल्पांचा आढावा घेऊन उपलब्ध पाणीसाठा, पाणीवाटपाबाबत चर्चा झाली.

# रायगड जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील-जिल्हाधिकारी किशन जावळे

## क्षयरोग मुक्त ३७६ ग्रामपंचायतींचा सत्कार

रायगड दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– रायगड जिल्हा क्षयरोग मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ही अतिशय उल्लेखनीय बाब असून रायगड जिल्हा १०० टक्के क्षयरोग मुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. जिल्हा क्षयरोग केंद्र व जिल्हा आरोग्य यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात क्षयरोग मुक्त झालेल्या ३७६ ग्रामपंचायतींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांचे स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनीषा विखे, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.प्राची नेहूलकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शितल जोशी, नॅशनल लीड डी. एफ.वाय,डॉ. श्वेता अरोरा, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ.आकाश राठोड उपस्थित होते.



जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, रायगड जिल्हा टीबीमुक्त करायचा असेल तर वैयक्तिक स्वच्छतेलाही महत्व दिले पाहिजे. वैयक्तिक स्वच्छता राहिली तर कुटुंब स्वच्छ राहील आणि कुटुंब चांगले राहिले तर गाव चांगले राहील. गाव चांगले राहील तरच आपला जिल्हा चांगला राहील. स्वच्छतेमुळे क्षयरोगच नाही तर इतर आजारांनाही आळा घालू शकतो. एखादी योजना यशस्वी करायची असेल तर त्या कामांमध्ये सातत्य असले पाहिजे. त्या योजनेची आपल्याला उद्दिष्ट माहीत असणे आवश्यक आहे आणि उद्दिष्ट पूर्ततेसाठी आपण मेहनत घेतली पाहिजे तरच यश मिळेल. क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतींनी हे सातत्य राखावे. क्षयरोग विषयीच्या प्रचार प्रसिद्धीसाठी सोशल मिडीयाचा वापर जास्तीत जास्त करावा अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड म्हणाले की, क्षयरोग हा मायक्रोबॅक्टेरियम ट्यूबर्क्युलोसिस या जिवाणूमुळे होतो. रायगड जिल्ह्यातील लोकसंख्या ही स्थलांतरित असून येथे आदिवासी भाग सर्वात जास्त आहे. तरीही आपल्या जिल्ह्याचे काम खूप चांगले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य यांनी प्रयत्न केल्याने ३७६ ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त झाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सेस फंडातून क्षयरुग्णांनी तीन महिन्याचे औषधाचे किट देण्यात येत आहेत असेही श्री.बास्टेवाड यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्रयोगशाळा पर्यवेक्षक जितेंद्र आहिरराव म्हणाले की, जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी आश्वासक पावले उचलण्यात येत आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मागील काही दिवसात ५ लाख १७ हजार ८१४ जणांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अति जोखीम ग्रस्तभाग, वयोवृद्ध, धूम्रपान-मद्यप्राशन करणाऱ्या व्यक्ती, कुपोषित व्यक्ती व मागील पाच वर्षातील क्षयरोग बाधित रुग्ण, टीबी रुग्णाशी संपर्कातील व्यक्ती, मधुमेह बाधित व एच.आय.व्ही. बाधित व इतर जोखीमग्रस्त व्यक्तीच्या समावेश होता. २०१४ या वर्षात ४ हजार २१८ नवीन क्षयरुग्ण आरोग्य विभागाने शोधून काढलेले आहेत. जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींपैकी ३७६ ग्रामपंचायतींमध्ये एकही क्षयरुग्ण नसल्याने या ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. आभार प्रदर्शन सतीश दंतराव यांनी मानले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. शेवटी मान्यवरांनी टी बी हरेल देश जिंकेल अशी शपथ सर्वाना दिली. कार्यक्रमास सरपंच,ग्रामसेवक,आशा सेविका उपस्थित होत्या.



# मतदार याद्यांच्या निरंतर अद्ययावतीकरण प्रक्रियेबाबत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक

मुंबई दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– मतदार याद्यांचे निरंतर अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक मतदान केंद्राकरिता राजकीय पक्षांकडून मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती यासंदर्भात मुख्य निवडणूक अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधी समवेत बैठक झाली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे डॉ.गजानन देसाई, भारतीय जनता पक्षाचे गोपाळ दळवी, शिवसेना पक्षाचे विलास जोशी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे रवींद्र पवार, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिन परसनाईक तसेच विविध मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राजकीय पक्ष हे निवडणूक प्रक्रियेतील महत्वाचे भागीदार आहेत. भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीशी क्षेत्रिय तसेच राज्यस्तरावर नियमितरित्या बैठका घेऊन निवडणुकीच्या विविध विषयाबाबत समन्वय राखण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील मतदार नोंदणी अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या स्तरावर १७ ते २० मार्च २०२५ या कालावधीत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधी समवेत बैठका घेण्यात आल्या असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी यावेळी दिली. या वेळी बैठकीमध्ये मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी मतदार याद्यांचे निरंतर अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक मतदान केंद्राकरिता राजकीय पक्षांकडून मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती यासंदर्भात सविस्तर माहिती दिली तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या सूचना समजून घेतल्या. तसेच याविषयांवावत सविस्तर चर्चा करुन सर्व राजकीय पक्षांच्या सूचनांची नोंद घेऊन त्या अनुषंगाने कायद्यातील तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

# मेळघाटातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाययोजना करणार-आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर

अमरावती दि.२९ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– मेळघाटातील आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्यासाठी दौरा करण्यात आला. त्यानुसार आज दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण आरोग्य केंद्रांना भेटी देण्यात आल्या. या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यविषयक असलेल्या समस्या जाणून घेण्यात आल्या. येत्या काळात मेळघाटात आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे, असे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी सांगितले.



मेळघाटातील आरोग्य यंत्रणांची पाहणी करण्यासाठी श्री. आबीटकर यांनी दौरा केला. आमदार केवलराम काळे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, तहसीलदार जीवन मोरनकर, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, सहायक संचालक भारती कुलवाल आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री श्री. आबीटकर यांनी मेळघाटात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील. इतर ठिकाणी ज्या सुविधा नागरिकांना मिळतात तशाच सुविधा मेळघाटतही तयार करण्यावर भर देण्यात येईल. अचलपूर येथील ग्रामीण रुग्णालय या भागातील महत्त्वाचे असल्यामुळे या ठिकाणी सुविधा वाढविण्यात येतील. आरोग्य यंत्रणेने सकारात्मक राहून नागरिकांना सुविधा पुरवाव्यात, असे आवाहन केले.

दरम्यान मंत्री श्री. आबीटकर यांनी सकाळी हतरू प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. केंद्रातील आंतररुग्ण कक्षातील रुग्णांकडून माहिती घेऊन संवाद साधला. तसेच प्रयोगशाळा, औषध भांडार आदींची पाहणी केली. यावेळी त्यांनी कार्यरत कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. केंद्रातील पाणी आणि विजेची समस्या तातडीने निकाली काढण्यात येईल. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सेवा द्याव्यात, अशा सूचना दिल्या. चुरणी येथील ग्रामीण रुग्णालयात श्री. आबीटकर यांनी औषधी विभाग, आंतररुग्ण कक्ष, प्रसूतिगृह, शस्त्रक्रिया गृह, रक्तसाठा केंद्र, एक्स-रे केंद्राची पाहणी केली.

यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या आरोग्य यंत्रणांनी जाणून त्यानुसार सुधारणा करावी. रुग्णालयात प्रामुख्याने ग्रामीण आणि गरजू रुग्ण येत असल्याने त्याला दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. हिरडा येथील अंगणवाडी केंद्राला त्यांनी भेट दिली. याठिकाणी ४७ बालके असून यातील एकही बालक कुपोषित नसल्याबद्दल कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. तसेच येत्या काळात चांगले कार्य करावे. बालकांचे पोषण होण्यासाठी त्यांना आणि मातांना सकस आहार पुरविण्यात यावा, असे निर्देश दिले. यावेळी लाभार्थ्यांना गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले. बोरुगव्हाण येथील ग्रामपंचायत कार्यालयाला श्री. आबीटकर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रामुख्याने रस्ते आणि आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यासाठी मदत करण्यात येईल, असे सांगितले. दौऱ्यादरम्यान श्री. आबीटकर यांनी नागरिक, संस्था आणि संघटना त्यांच्याकडून निवेदने आणि तक्रारी स्वीकारल्या.

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक – शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा 'ग्लोबल भारत'




दैनिक ग्लोबल भारत
देशातील सर्वात मोठा पक्ष आपल्या पाठिशी -एकनाथ शिंदे

**मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....**

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com